# माणूस

शनिवार । ५ जानेवारी ७४ । पन्नास पैसे




अजून खेळ रंगलेला नाही !

# मोलकरी

## जी. ए. कुलकर्णी हे इसम –

आपले सरकार खरे म्हणजे फार्फार कलाप्रेमी आहे. खुद्द कलावंतांना तसे वाटत नसले तरी तुमच्यासारख्या सामान्यांना तसे जरूर वाटते; आणि जिवंत लोकशाहीमध्ये सामान्यांना काय वाटते ते महत्त्वाचे असते. कलाप्रेमापोटी, कलेचे निकोप संगोपन व्हावे म्हणून, सरकारने अगणित समित्या-संस्था-मंडळे निर्माण केली आहेत. साहित्य अकादमी ही त्यातली एक विशेष तालेवार संस्था आहे. तिचा कार्यविस्तार फार मोठा आहे, अशी अफवा आहे. मला मात्र तिचे पुस्तकांना बक्षिसे देण्याचे कार्य तेवढे ठाऊक आहे. तेसुद्धा बक्षीस घसघशीत पाच हजारांचे असते म्हणून.

यंदा ते बक्षीस आमच्या जी. ए. कुलकर्ण्यांच्या ' काजळमाया ' या संग्रहाला लाभले आहे. जी. ए. कुलकर्ण्यांना ' आमचे ' म्हणण्याइतकी काही त्यांची–माझी सलगी नाही. पण कोणीही साहित्यिक, मला आपला सगासोयरा वाटतो. त्याचे साहित्य ही माझ्या दृष्टीने दुय्यमतिय्यम गोष्ट असते. त्याचे दिसणे, बोलणे, वागणे, त्याचे उद्योगधंदे, त्याच्याबद्दलच्या सुरस आणि चमत्कारिक दंतकथा, यांच्याबद्दल मला भाबडे आणि भळभळीत कुतुहल असते. बरे, मराठी साहित्यिक स्वतःला अनुभवसंपन्न करण्यासाठी सामान्यांच्या जगात त्यांच्याबद्दलचे कुतुहल शमविता येते.

जी. ए. कुलकर्णी हे इसम मात्र जरा वेगळे दिसतात. म्हणजे ते म्हणे कोणाला दिसतच नाहीत. जेथे साहित्यिक हटकून दिसावे अशा सभा–समारंभातसुद्धा जी. ए. कधी दिसल्याचे ऐकिवात नाही. एकूण हा इसम फक्त लिहितो आणि स्वस्थ राहतो. याच्याजवळ स्वतःचे छायाचित्रदेखील नाही असे म्हणतात. वास्तविक जातिवंत साहित्यिकाजवळ एकवेळ स्वतःचे काही खास वैशिष्टय नसले तरी चालते; पण स्वतःचे खास छायाचित्र नसेल तर काही चालणे मुश्कीलच आहे.

तथापी, या जी. ए. कुलकर्ण्यांचे तर बरे चाललेले दिसते. ' निळासावळा, ' ' पारवे ', ' हिरवे रावे ', ' रक्तचंदन ' आणि ' काजळमाया ' असे त्यांचे पाच कथासंग्रह गेल्या पंधरा वर्षात प्रसिद्ध झाले ' निळासावळा ' आणि ' रक्तचंदन ' या संग्रहांना महाराष्ट्र सरकारची बक्षिसे मिळाली आणि आता ' काजळमाया ' या नव्या संग्रहाला तर साहित्य अकादमीने बक्षीस दिले आहे बक्षिसांचे सोडा; जी. ए. सारखा दुसरा मराठी लेखक नाही, असे साधेसुधे रसिकच नव्हे तर खत्रुड लेखकसुद्धा म्हणत असतात. असे भाग्य मराठीत तरी दुर्मिळ आहे.

एवढे हे बक्षीस मिळाल्यामुळे तरी जी. ए. चे व्यक्तिचित्र रंगवणारे एक-दोन लेख प्रसिद्ध होतील अशी आशा मला आहे. मग, जी. ए. दिवसा लिहितात की रात्री, स्वतः लिहितात की कोणाला सांगतात, लिहिताना चहा–सिगारेट–दाणेबिणे लागतात काय, ते शाकाहारी आहेत की मांसाहारी, त्यांना रंग कोणता आवडतो, बूट वापरतात की चपला, लोकशाहीबद्दल त्यांचे काय

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

५ जानेवारी १९७४

# माणूस

वर्ष : तेरावे । अंक : बत्तिसावा

**सप्रेम नमस्कार....**

## बेळगावचे मराठीपण

२२ डिसेंबरचा 'माणूस' वाचला. त्यामधील 'मग बेळगावला उशीर का?' हे वाचले. श्री. सोमण यांनी सदर लेख पुण्यात लिहिला आहे व मुंबईत कर्नाटकीय मंत्रीमहाशयांशी गप्पा मारल्या आहेत. गप्पांच्या ओघात श्री. हेगडे यांनी खुद्द बेळगाव शहर सोडले तर इतर सीमा भागाबद्दल वाद असा तो नाहीच आणि ते शहर भौगोलिक, सांस्कृतिक दृष्टया आजूबाजूच्या कानडी प्रदेशाशी जखडले आहे. मराठी प्रदेशाशी नाही असा जो युक्तिवाद केला तो श्री. सोमण यांना पटलेला दिसतो. पण या बाबतीत खरी वस्तुस्थिती अशी आहे की, बेळगाव अवती भवती मराठी संस्कृतीनेच जखडले आहे, कानडी नाही. कोल्हापूर-कागल हा मराठी प्रदेश सोडून कर्नाटकात आपण जातो तेव्हा सुरुवात कोगनोळी या २०-२५ हजारांच्या वस्तीच्या लहान गावात होते. गावात दोन मोठ्या—मराठी मुलांची व मुलींची—शाळा आहेत. (येथील पुष्कळसा स्टाफ कागल कोल्हापूरला राहून नोकरीसाठी up down करतो.) कानडी शाळा चालविण्याचा प्रयत्न २।३ वर्षे केला. एक शिक्षक केवळ १०।१२ मुले असे होते. पुढे शाळा बंद पडली. पुढे निपाणी हे जवळ जवळ मराठी संस्कृतीच असलेले गाव आहे. कानडी फारच कमी. तेथून जवळच चिकोडी ७५% मराठी. संकेश्वरला थोडीफार कानडी वस्ती, पण मराठी जास्त. बेळगाव पासूनचे वडगाव, अनगोळ, शहापूर, यल्लूर संपूर्ण मराठी. पुढे खानापूर. तेथेसुद्धा ८० टक्के मराठी आहेत. कानडी बहुसंख्य असलेला खरा प्रदेश सुरू होतो तो लोंढ्यापासून. तेव्हा बेळगाव हे भौगोलिक दृष्टया, सांस्कृतिक दृष्टया

**पृष्ठ ३१ वर**

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.**

मध्यमुंबई निवडणूक

# उमेदवारांची गाठभेट

सु. ल. सोमण

अविभक्त काँग्रेसमधून मोरारजी–स. का. पाटील–कामराज आदी सिंडीकेटला डच्चू दिल्यानंतर, १९७१ मध्ये फार मोठी इंदिरा लाट देशात आली होती. 'गरिबी हटाव' ह्या इंदिराजींच्या घोषणेपुढे 'इंदिरा हटाव' ही विरोधकांची घोषणा पार हास्यास्पद वाटली. १९७१ च्या लोकसभा निवडणुकात काँग्रेस (किंवा इंदिरा म्हणूयात !) विरोधकांचा पार धुव्वा उडाला. अतीरथी-महारथी तेव्हा कोसळले आणि शेंदूर फासलेला वाटेवरचा दगडही देवपणाला जाऊन पोचला ! आज तीन वर्षांनी मात्र चित्र पार बदलले आहे. १९७१ मध्ये निवडून आलेली काँग्रेस पूर्वीच्या काँग्रेसहून फार वेगळी नाही, किंबहुना अजिबातच वेगळी नाही असे लोकांना जाणवू लागले. गेल्या वर्षीच्या दुष्काळानंतर देशभर जे आर्थिक सावट आले आणि महागाई उसळली, तंटे उफाळले तेव्हा तर लोकांचा ह्या सरकारवरील विश्वास डळमळीत झाला. चौफेर महागाई अन्नधान्य टंचाई ह्यावर लोकांच्या प्रतिक्रिया तीव्र झाल्या. अलिकडे निरनिराळ्या राज्यातून विधानसभा, लोकसभा पोटनिवडणुकातून काँग्रेसला जे पराभव पत्करावे लागले याचे काहीसे स्पष्टीकरण लोकांच्या सद्यस्थितीवरील तीव्र प्रतिक्रियातच सापडू शकेल. गुजरातेत साबरकाठा आणि मध्यप्रदेशात महू इथे पराभव स्वीकारून काँग्रेस मुंबईत लोकसभेच्या पोटनिवडणुकीला सामोरी जात आहे. १३ जानेवारी, १९७४ रोजी मध्य मुंबई (उत्तर) मतदार संघातून होणारी लोकसभेची पोटनिवडणूक म्हणूनच, इतर कुठल्याही पक्षापेक्षा काँग्रेसच्या दृष्टीने प्रतिष्ठेची बनली आहे !

जनसंघ किंवा कम्युनिस्टांच्या आधी, काँग्रेसने आपला प्रचाराचा नारळ फोडला, शंकर दयाळ शर्मा, मोहन धारिया, रघुनाथराव खाडिलकर वगैरे केंद्रीय नेत्यांच्या प्रचारसभा घडवून आणल्या ह्याचे कारणही हेच आहे. आणखीही मोठे केंद्रीय नेते काँग्रेसचे

उमेदवार श्री. रामराव आदिक ह्यांच्या प्रचारार्थ येऊ घातले आहेत असे समजते.

ह्या लढतीतले मुख्य पक्ष काँग्रेस, जनसंघ, कम्युनिस्ट आणि हिंदू महासभा! ह्या चौघानी जरी आता प्रचाराचे मोर्चे बांधायला सुरुवात केली असली तरी ह्या मतदारसंघात अजून तरी निवडणुकीचे वातावरण नाही. हिंदू सभेच्या सावरकरांच्या सोडल्या तर अद्याप भितीही कुठे रंगलेल्या नाहीत. कापडी फलक, भित्ती-पत्रकांचे युद्ध तर दूरच! इथल्या मतदारातही अजून तरी काही उत्साह नाही. काही अनपेक्षीत घडून वातावरण तापले तर सांगता येत नाही, पण एरवी, नेहमीच्या निवडणुकांपेक्षा सध्याचे वातावरण फार फार थंड आहे. हे वातावरण फारसे तापायचीही शक्यता दिसत नाही. आणि अशा परिस्थितीत सुमारे साडेसहा लाखांपैकी जेमतेम तीन-साडेतीन लाख मतदार मतदानासाठी मतदान केंद्राकडे फिरकला तरी पुष्कळ असे म्हणावे लागेल.

१९७१ साली शिवसेनेचा एक लाखावर मतांनी पराभव करून काँग्रेसचे श्री. भंडारे ह्या मतदारसंघातून निवडून लोकसभेत गेले होते. अलिकडेच त्यांची बिहारच्या राज्यपालपदी नेमणूक झाल्याने ही जागा पुन: रिकामी झाली आहे. १३ जानेवारी ७४ ला ही पोटनिवडणूक असून, दोन अपक्षासह सहा जण ही निवडणूक लढवीत आहेत. काँग्रेसचे अॅड. रामराव आदिक, जनसंघाचे आ. डॉ. वसंतकुमार पंडीत, कम्युनिस्टांच्या कॉ. श्रीमती रोझा देशपांडे, हिंदूमहासभेचे श्री. विक्रम सावरकर व दोन अपक्ष श्री. दोडके आणि श्री. के. टी. मिरचंदानी हे ते सहा उमेदवार! रिंगणात सहा उमेदवार असले तरी, मुख्य लढत काँग्रेस–जनसंघ–कम्युनिस्ट ह्यांच्यातच होईल असे दिसत आहे. हिंदूसभेचे सावरकर ह्यांच्या प्रचाराचा जोर वाढत आहे. काही ठिकाणी शिवसैनिक त्यांच्या प्रचारार्थ उभे आहेत. शिवसेनेने आपले बळ त्यांच्या बाजूने जर कदाचित उभे केले तर सावरकरांना मिळणारी मते निवडणुकीच्या निकालाला कदाचित कलाटणीही देऊन जातील. अर्थात आज वातावरण थोडंही तापलेले नसताना ह्यासंबंधी काही निश्चित आडाखे बांधणे थोडे कठिणच आहे.

ह्या संपूर्ण निवडणुकीत प्रत्यक्ष भाग न घेताही 'शिवसेना' मात्र चर्चेचा विषय होऊन बसली आहे. १९७१साली इंदिरा-लाटेचा प्रभाव असतानाही शिवसेनेच्या प्रि. मनोहर जोशांनी काँग्रेस विरोधात दुसऱ्या क्रमांकाची लाखाहून अधिक मते पटकावली होती. महापालिकेच्या निवडणुकात ह्या मतदारसंघात समाविष्ट २५ वॉर्डांपैकी आठ वॉर्डात विजय मिळवून शिवसेनेने आपले मतदार वाढवले होते. महागाई विरोधातले आंदोलन, १८ डिसेंबरच्या मुंबई बंदचे यश, सीमा प्रश्न ह्या साऱ्याचे भांडवल करून, महागाईने त्रस्त झालेल्या मुंबईकरांस आपल्याकडे अधिक खेचून घेणे शिवसेनेला सहज शक्य होते.

ह्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक शिवसेनेने लढवणे तार्किक दृष्टया सुसंगत ठरले असते. शिवसेनेचा निवडणूक न लढविण्याचा निर्णय म्हणूनच अनेकांना बुचकळ्यात पाडणारा ठरला आहे! 'करंट' साप्ताहिकाला दिलेल्या मुलाखतीत, इंदिराजींची भलामण करून आणि 'लोकसभेच्या मासळी बाजारात आपला उमेदवार पाठविण्यात आपल्याला रस नाही' असे सांगून श्री. बाळासाहेब ठाकऱ्यांनी लोकांना आणखी एक आश्चर्याचा धक्का दिला आहे. शिवसेनेने अजूनही कुणालाच आपला अधिकृत पाठिंबा दिला नाही हेही इथे लक्षात घेण्यासारखे आहे.

ह्या संबंधात श्री. मनोहर जोशी ह्यांची प्रतिक्रिया मात्र थोडी वेगळी होती. त्यांच्या मते, 'काँग्रेसला ह्या ठिकाणी विरोध करण्यासाठी शिवसेनेलाच खरे म्हणजे भरपूर वाव होता. परंतु विरोधी पक्षात एकवाक्यता नसल्याने आणि केवळ स्वतःच्या ताकदीवर ही जागा जिंकता येत नाही हा अनुभव असल्यामुळे ही जागा लढवायची नाही असा आम्ही निर्णय घेतला...सर्वमान्य एकच एक विरोधी उमेदवार उभा करण्यासंबंधी बोलणी सुरू असतानाच जनसंघाने आपला उमेदवार जाहीर करून टाकला हेही इथे लक्षात घेतले पाहिजे...'

काही का असेना, पण शिवसेना अनपेक्षितपणे निवडणुकीच्या रिंगणात नाही ही मात्र वस्तुस्थिती आहे आणि त्याचा सर्वात मोठा फायदा काँग्रेसला मिळणार आहे हे देखील नाकारण्यात हशील नाही. मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष बॅ. रजनी पटेल ह्यांच्या कार्यालयात ह्याचा आनंदही मला चांगलाच जाणवला. तिथला एक कार्यकर्ता मोठ्या उत्साहाने म्हणाला, 'शिवसेना नाही म्हणजे आता आम्ही निवडणूक जिंकल्यातच जमा आहे.' शिवसेनाही ही निवडणूक केवळ काँग्रेसच्याच सोयीसाठी लढवीत नाही आहे हा प्रच्छन्न आरोपही इतर कार्यालयातून ऐकायला मिळाला. '१८ डिसेंबरच्या 'शिवसेने'च्या 'मुंबई बंद'ला जो संपूर्ण पाठिंबा श्री. रजनी पटेलांनी दिला तो शिवसेनेच्या निवडणुकीतील सहकार्याच्या मोबदल्यातच. ह्याखेरीज बाळासाहेब ठाकऱ्यांना मोठी बिदागी मिळाली, उमेदवार उभा न करण्याबद्दल ती वेगळीच. काँग्रेसेतर निवडणूक कार्यालयातून मला ऐकायला मिळालेल्या गंभीर आरोपाचे हे सार होते.

श्रीमती रोझाबाई देशपांडे ह्यांच्याकडे बसलो असता एक कम्युनिस्ट कार्यकर्ते कडवटपणे म्हणाले, 'ह्यापेक्षा बाळासाहेब ठाकरे आणि 'त्यांची' शिवसेना उघड उघडपणे काँग्रेसमध्ये गेली तर फार बरे होईल. दोघांचेही स्वरूप उघडे पडेल आणि 'शिवसेने'च्या नावाखाली काम करणाऱ्या पोरांच्या मनात निर्माण झालेला गोंधळ तरी थांबेल...'

शिवसैनिकात असा गोंधळ मात्र उडाला आहे हे मी स्वतः पाहिले. नायगाव विभागातले शाखाप्रमुख श्री.

भूमकर हे श्री. सावरकरांचे काम करीत आहेत. तर दादरला काही सैनिक जनसंघाचे काम उघडपणे करीत आहेत. श्री. रामराव आदिकांचेही काम लालबागचे शिवसैनिक करीत आहेत असे मला ऐकायला मिळाले. सर्वश्री रामराव आदिक, वसंतकुमार पंडित आणि विक्रम सावरकर तिघांनीही माझ्याजवळ बोलतानाही शिवसैनिक त्यांच्यासाठी कामाला लागल्याचे मला सांगितले...

श्री. रामराव आदिक हे सुरुवातीला शिवसेनेच्या व्यासपीठावर असत. ती जवळीक साधूनच शिवसेनेला चुचकारण्यासाठीच श्री. आदिक ह्यांची उमेदवारी जाहीर झाली असेही बोलले जात आहे...

कॉंग्रेस आणि शिवसेना ह्या दोन्ही गोटांतून असल्या 'युती' वगैरेचा साफ इन्कार करण्यात येतो. श्री. बाळ ठाकरे व श्री. रजनी पटेल ह्यांची मध्यंतरी दहा मिनिटे भेट झाली. ह्यावरून उठलेले हे काहूर आहे, असाच ह्या दोन्ही गोटांचा सूर आहे. 'बंद'ला कॉंग्रेसने दिलेल्या पाठिंब्यामागेही असले काही राजकारण असल्याचा श्री. रजनी पटेलांनी साफ इन्कार केला. '...सीमा प्रश्नावर लोकांच्या भावना किती स्फोटक झाल्या आहेत, त्याची चांगली प्रचिती मला आली आहे. जनतेच्या ह्या भावनांशी बी. पी. सी. सी. देखील समरस आहे. ह्या भावनांशी सहमत असताना 'बंद'ला विरोध दर्शवून तणाव वाढविण्यात काय हशील होते ? आम्ही 'बंद'ला विरोध दर्शविला असता तर 'बंद' शांतपणे पार पडला नसता. To avoid any such Confrontation, 'बंद'ला आम्ही पाठिंबा दिला...'

शिवसेना-कॉंग्रेसचा धागा धरूनच मी श्री. रामराव आदिकांच्या घरी गेलो. 'महाराष्ट्र हितवर्धिनी' ह्या आपल्या संस्थेचा परिचय करून देऊन श्री. आदिक म्हणाले, '...मराठी माणसाला, त्याच्या जमिनीवर, त्याच्या पैशावर (कारण बहुसंख्य उद्योगधंद्यात सत्तर ऐंशी टक्के सरकारी म्हणजे जनतेचाच पैसा कर्जरूपाने गुंतून पडलेला असतो!) उभ्या राहणाऱ्या उद्योगधंद्यात नोकरीसाठी प्राधान्य मिळावे ह्या मागणीत काहीच वावगे नाही. महाराष्ट्र हितवर्धिनीतर्फे हीच मागणी आम्ही प्रथम मांडली. ही व अशाच अन्य काही मागण्या घेऊन शिवसेना उभी राहिली तेव्हा, एका झगड्यासाठी दोन संस्था नकोत म्हणून आम्ही शिवसेनेच्या सभांना गेलो ह्यात काही चूक आहेसे वाटत नाही. तेव्हा शिवसेना हा राजकीय पक्ष बनेल असेही वाटले नव्हते. तथापि शिवसेनेचे एकूण स्वरूप स्पष्ट होऊ लागताच मी शिवसेनेला रामराम ठोकला...मुळात मी शिवसेनेचा सभासदही झालो नव्हतो... आता माझ्या मतामुळे व त्यांचा स्वतःचा उमेदवार नसल्याने शिवसैनिकांना, इतर उमेदवारांपेक्षा मी जवळचा वाटणे, त्यांनी मला पाठिंबा देणे हेही साहजिकच आहे.'

ह्या निवडणुकीच्या अनुषंगाने इतर

प्रश्नाकडे वळत श्री. रामराव आदिक म्हणाले, ' बेळगावचा प्रश्न सुटला पाहिजे ही आमचीही भूमिका आहे. आमचेच मुख्यमंत्री त्यासाठी धडपडताहेत, शिष्टमंडळ घेऊन दिल्लीला जाताहेत. तेव्हा हा ह्या निवडणुकीच्या दृष्टीने काही ' इश्यू ' आहे असेच मला वाटत नाही महागाईचा प्रश्न लोकांच्या जीवन मरणाचा बनला आहे, त्यामुळे त्यांच्यात नैराश्य आले आहे हे मला मान्य आहे. पण ही एक तात्पुरती अवस्था आहे असे मला वाटते. ह्या मोसमात पिके बरी येत आहेत, धान्य उपलब्ध होत आहे आणि किंमतीही कमी होत आहेत. त्यामुळे तीन महिन्यापूर्वीचे नैराश्य आज तुम्हाला आढळणार नाही. रेशनला काही महिन्यापूर्वी एकावेळी सगळे धान्य मिळत नसायचे. ते आज मिळते आहे. रेशन दुकानावरच्या रांगा कमी झाल्या आहेत ! प्रश्न मार्गी लागताहेत ! बरे अन्नधान्य भाववाढ ही आज जागतिक समस्या होऊन बसली आहे. इंग्लंडमध्ये काही महिन्यापूर्वी आठ पेन्स डझन अंडी मिळत. आज त्याच डझन अंड्यांना वीस पेन्स पडत आहेत... तेव्हा प्रश्न आहेत, पण त्याविरूद्ध नुसती ओरड करण्याऐवजी मार्ग शोधले पाहिजेत. गेल्या दिवाळीपूर्वी भाऊसाहेब वर्तकांना भेटायला विरोधक गेले असता, आटा-मैदा वगैरे आम्ही स्वस्त दरात पुरवतो, तुम्ही विका असे आवाहन भाऊसाहेबांनी केले. एकही पक्ष तेव्हा सहकार्यासाठी पुढे आला नाही. काँग्रेसने मात्र सतत २-३ महिने स्वस्त धान्याची दुकाने चालवली . जनसंघाने एक दिवस चालवली. टी. व्ही. कॅमेरेवाले आले तेव्हा, ' शो ' साठी अशी दुकाने चालवून प्रश्न कसे सुटणार...एकाधिकार खरेदीविरूद्ध जनसंघाचे धोरण माहीत आहेच तुम्हाला. एकीकडे बारा किलो धान्याची मागणी करायची, दुसरीकडे शेतकऱ्यांना लेव्ही घालू नका, सरकारला धान्य देऊ नका म्हणून चिथवायचे...'

कामगारांच्या संबंधात बोलताना श्री. आदिकांनी कम्युनिस्टांवर हल्ला चढवला. '...सात दिवसांचा आठवडा म्हणजे कामगारांना सहा ऐवजी सात दिवस काम करायला सांगणे नव्हे. साती दिवस गिरण्या चालू ठेवून कामगारांना दर सहाच दिवसांनी आळीपाळीने रजा देणे एवढाच ह्या नव्या पद्धतीचा अर्थ. त्यामुळे २५००० नव्या नोकऱ्या उपलब्ध होतात. त्याही कामगारांच्याच आप्तेष्टांना. शिवाय पगारवाढ मिळते व राष्ट्रीय उत्पादनही वाढते. विखुरलेल्या दिवशी रजा असल्याने सलून्स, रेशनदुकान, उद्याने वगैरे ठिकाणची रजेच्या दिवशीची गर्दीही कमी होऊन कामगारांचा वेळही वाचेल. कामगारांच्या सर्वस्वी फायद्याची असूनही, केवळ संघाने केलेला करार म्हणून कम्युनिस्ट्स ह्या कामगार हिताच्या बदलाला विरोध करीत आहेत...

खास मुंबईच्या प्रश्नांकडे वळून श्री. आदिक ह्यांनी ' बॅक बे 'ला विरोध

दर्शवला. झोपड्या, मोडकळीस आलेल्या चाळी ह्या संबंधात शासनाने कायदे केले आहेत, ते त्वरेने अंमलात आले पाहिजेत असे ते म्हणाले. दुसऱ्यांच्या चाळी दुरूस्त करून देण्याची महाराष्ट्र सरकारची योजना हे एक 'युनिक्' उदाहरण आहे. सबंध जगात कुठेही असला उपक्रम कुठल्याही शासनाने हाती घेतलेला नाही. आणि तरीही ह्या सरकारला प्रतिगामी म्हणायचे हा उरफाटा न्याय आहे...

'.. कार्यक्रमांच्या अंमलबजावणीच्या संदर्भात मला मोरारजी भाईंच्या शब्दांची आज आठवण येते. (त्यांची राजकीय विचारसरणी काय आहे ते तूर्त बाजूला ठेवू!) ते म्हणत, सर्व शासकीय, सनदी नोकर हे प्रथम उत्तम प्रतीचे सामाजिक कार्यकर्ते असायला हवेत, तरच योजलेल्या, आखलेल्या कार्यक्रमांचे चीज होऊ शकेल...'

'...एक गोष्ट मात्र नक्की. भाववाढ असो; महागाई असो, बेळगाव असो की मुंबईचे प्रश्न असोत, त्यासाठीही झगडायला सत्ताधारी पक्षाचाच माणूस ज्यास्त उपयोगी पडतो. मुंबईसाठी, महाराष्ट्रासाठी केंद्राबरोबर भांडायलाच आदिकना निवडून द्या असे खुद्द वसंतराव नाईकांनीच परवा सभेत सांगितले आहे,' असे हसून म्हणत श्री. आदिक शेवटी म्हणाले, 'कशासाठीही, काँग्रेसच अधिक परिणामकारक ठरेल, फुटकळ विरोधी पक्ष नाही' हे लोकांनी लक्षात घेतलं पाहिजे...'

□

गिरण्यातल्या सात दिवसांच्या आठवड्यावर श्रीमती रोझा देशपांडे ह्यांची मते अत्यंत कडवट दिसली. कम्युनिस्ट नियंत्रित आयटक, डाव्या कम्युनिस्टांची सीटू व अन्य डाव्या गटांनी ह्या प्रश्नावर काँग्रेस-इंटक प्रणीत मिल मझदूर संघाला कडवा विरोध करायचे ठरवले असून, आपल्या मागण्यासाठी ३० डिसेंबर पासून मुंबईतल्या २ लाख गिरणी कामगारांना बेमुदत संपाचा आदेश दिला आहे. ह्याखेरीज ह्याच गटांनी आणि पक्षांनी २ जानेवारीला महाराष्ट्र बंदचा आदेश दिला आहे – महागाई, अन्नधान्य, दुर्भिक्ष, काळाबाजार वगैरे संबंधांत जनतेच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्यासाठी! मध्य मुंबईत कामगारांची वस्ती फार मोठी आहे. दलित, उपेक्षित समाजही मोठा आहे. कम्युनिस्ट नेतृत्वाखालील वरील दोन आंदोलनांच्या अनुषंगाने ह्या सर्वांचे मत आपल्याकडे खेचायचा पुरेपूर प्रयत्न कम्युनिस्ट पक्ष करील हे उघड आहे. पक्षाध्यक्ष कॉ. डांगे आज खूप थकलेले वाटतात. पण तरीही त्यांनी प्रचारयंत्रणा आपल्या हातात ठेवून प्रचाराला जबरदस्त गती दिली आहे. त्यांची अलिकडची धूमधडाका भाषणे ऐकली की, भाषणासाठी मंचकावर आल्यावर ते आपले वय, आपला थकवा विसरून जातात असेच वाटते! कॉ. श्रीमती रोझा देशपांडेंचा प्रचार, गिरण्यातला संकल्पित संप व २ जानेवारी–महाराष्ट्र बंद ह्या लढ्यांचा प्रचार हे सारे ते एकाच वेळी, परस्परांना पूरक दिशा

देऊन करीत आहेत. श्रीमती देशपांड्यांच्या मतांवर त्यामुळे मोठा अनुकूल परिणाम होणार आहे ह्यात शंका नाही. '...रविवारची सामुदायिक सुट्टी मारून आम्हीं ज्यादा लोकांना काम देणार असे संघाचे (इंटकचे!) नेते आवर्जून सांगतात. पण आज बहुसंख्य गिरण्यातून तिसरी पाळी चालत नाही. अनेक गिरण्यांना टाळे ठोकले गेले आहेत. हे ठोकलेले टाळे खोला आणि गिरण्या-गिरण्यातून तिसरी पाळी सुरू करा. तिसरी पाळी जिथे सुरू करता येत नाही तिथे सात दिवसांच्या आठवड्याचा फुका आग्रह कशाला? आमच्या ह्या म्हणण्यात उत्पादन वाढीला विरोध कुठे आहे तेच मला समजत नाही...'

श्रीमती रोझा देशपांडे वरीलप्रमाणे भूमिका विशद् करून पुढे म्हणाल्या. ' गिरण्यांमधून आज नफे भरमसाठ वाढले आहेत. महागाईचा राक्षस आपण पाहतो आहोच. अशा वेळी पगार वाढवून मागितले त्यात गैरवाजवी काय?... किमान ७५ रु. हंगामी पगारवाढ ताबडतोब मिळाली पाहिजे व सर्व प्रश्नांवर बोलणी करण्यासाठी संघाबरोबरच युनियनलाही बोलावले पाहिजे. ह्या प्रमुख मागण्यांसाठी ३० डिसेंबर पासून बेमुदत संपाची हाक कम्युनिस्ट व अन्य डाव्या गटांनी दिली आहे.'

गिरण्यांमधील ह्या वादंगाकडून मी विषय थोडा दुसरीकडे वळवला. इंदिराबाईंचा आज सर्वात मोठा पुरस्कर्ता गट म्हणजे कम्युनिस्ट पक्ष बनला आहे. १९७१ पासून कम्युनिस्ट पक्षाने काँग्रेसबरोबर ठिकठिकाणी सहकार्य केले आहे. १९७१ ला काँग्रेसच्या पाठिंब्यावर अनेक कम्युनिस्ट खासदार निवडून आले. केरळात काँग्रेस-कम्युनिस्ट संयुक्त मंत्रिमंडळच अधिकारावर आहे. उत्तर प्रदेशात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकात काँग्रेस-कम्युनिस्ट युती जवळजवळ पक्की झाली आहे. 'आपण डांग्यांना गुरुस्थानी मानतो' हे मुंबई काँग्रेस अध्यक्ष श्री. रजनी पटेल ह्यांचे जाहीर निवेदन आहे. जनसंघ-शिवसेनादी मंडळी रजनी पटेलांना छुपे कम्युनिस्टच मानतात. ह्या पार्श्वभूमीवर आणि ताज्या रशिया-भारत करारानंतर रजनी पटेलांच्या उमेदवारीला कम्युनिस्टांचा विरोध बराच खटकतो. साहजिकच हा प्रश्न खुद्द कम्युनिस्टानाही अपेक्षित दिसला. श्रीमती रोझाबाईंनी आपले जाहीर पत्रकच ह्या प्रश्नाच्या उत्तरात मला काढून दिले आणि म्हणाल्या,

'...इंदिराबाईंची काही धोरणे प्रागतिक आहेत. त्याबाबत आम्ही त्यांना पाठिंबा, सहकार्य देत आहोतच, पुढेही देऊ, पण ह्याचा अर्थ असा नाही की इंदिराजींच्या नावावर आम्ही इथे नाईकांनाही फुका पाठिंबा देऊ. नाईक सरकारने एक तरी उदाहरण असे दाखवून द्यावे की जिथे त्यांनी कामगारांची बाजू उचलून घेऊन त्यांना न्याय दिला आहे. साधा महागाईचा प्रश्न घ्या. उत्पादन कमी झाले म्हणून

पृष्ठ २५ वर

दामखिंड आघाडी

# विलशेत गावचा कमल्या पद्या पुंजारा जेव्हा लेव्ही घालतो !

शेतकरी मंडळाच्या सभासद शेतकऱ्यांना लेव्ही लागू नसूनही शासनाला भात विकायचे ठरविले. तेव्हा ठाणे जिल्ह्याच्या कलेक्टरना बोलावून हा भात विकायचा कार्यक्रम गेल्या आठवड्यात पार पाडला. त्याचा वृतांत देत आहे.

आजच सकाळी चिचारा गावात जाऊन आलो. तिथे नदीकाठची गवती जमीन आहे. सावकार लोक बळजबरीने अगदी पोलिस आणून गवत कापून नेतात. भातशेती पडीक राहते. हप्ते न भरल्याने सरकारकडून जप्तीच्या नोटिसा आल्याने ही आदिवासी कुळे शेतकरी मंडळाकडे धावून आली आहेत. चिचारा गाव मनोरपासून पंधरा मैल आणि बोईसर स्टेशनपासूनही पंधराएक मैल अंतरावर आहे. अत्यंत आडरानात सूर्यानदीच्या काठावरच्या या गावात केवळ पोहोचणे आणि काहीतरी काम सुरू करणे This in itself is something dynamic असे तिथे जाऊन आल्यानंतर वाटले. आज आवांबरोवर ट्रकने गेलो होतो. परवा मी एकटा चालत जाऊन आलो. Exploration साठी गेलो आणि या जंगलात आपण स्वत: जमले तर तिथेच राहून काम करायचे असे ठरवून आलो. काम होणे ही तेथील लोकांची गरज आहे आणि जिथे गरज आहे तिथेच आपले काम आहे.

भात विक्री सरकारला करावी हे–पटवण्यासाठी गावोगाव भटकलो. त्यानिमित्ताने त्यांच्यात राहण्याचा, जेवण्याचा अगदी देव खेळवणे, गावदने साजरा करणे, मयताचे दिवस करणे या त्यांच्या कार्यक्रमात भाग घेण्याचाही योग आला. योग्य संधी मिळाली तेव्हा त्यांच्या या गोष्टीवर टीकाही बरीच केली. लिहिण्यासारखे बरेच आहे पण कामाच्या धबडग्यात वेळ अपुरा पडतो. तरीही प्रयत्न करीन. कळावे.

आपला

**दिलीप जोशी**

¤

'आज कलेक्टरसाहेबांपुढे जमलेले आपण सर्व लहान शेतकरी आहोत. आजच्या कार्यक्रमाला 'लेव्ही दिन' असे अधिकृतरीत्या म्हणत असले तरी लेव्हीचे भात देण्यासाठी आपण जमलो आहोत असे मी मुद्दामच म्हणत नाही. लेव्ही या शब्दात एक प्रकारची सक्ती आहे. अमुक एकर असणाऱ्या इसमाने इतके भात शासनाला दिलेच पाहिजे असा आदेश त्यात आहे. आणि आपण तर अशा लेव्हीला अपात्र आहोत. इतकी कमी जमीन असणाऱ्या शेत-

कऱ्यांना लेव्ही द्यावी लागत नाही. पण तरीही आपणहून शासनाच्या खरेदी-विक्री व्यवस्थेला भात विकीत आहोत. याचा अर्थ आपल्याकडे मुबलक भात आहे असा बिलकुल नाही. परंतु शासनाने स्वस्त धान्य दुकानातून पुरेसे धान्य द्यावे असे जेव्हा आपण आपला हक्क म्हणून म्हणतो, तर आपली जबाबदारी अशी आहे की शासनाला आपणही भात दिले पाहिजे. मीठमिरची घेण्यासाठी आपण थोडे भात विकतोच. तर मग ते शासनालाच विकून आपली जबाबदारी पूर्ण करीत आहोत असे दाखवून दिले पाहिजे...' लेव्ही दिनानिमित्त शेतकरी मंडळाने शासनाला भात द्यायचा कार्यक्रम होता त्यावेळी जमलेल्या सभेत आबा करमरकर बोलत होते. ठाणे जिल्ह्याचे कलेक्टर श्री. रंगनाथन हे उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी पालघर तालुका पंचायत समितीचे सभापती श्री. मनोहर पंडित हे होते. शेतकरी मंडळाचे अध्यक्ष श्री. काळूराम धोपडे, पंचायत समितीचे उपसभापतीचे श्री. मोरे, तहसीलदार श्री. पेढे, गटविकास उपअधिकारी श्री. माळी इत्यादी मंडळी उपस्थित होती. सभेला तीनचारशे आदिवासी स्त्रीपुरुष हजर होते.

'भूमिपुत्र प्रतिष्ठान'च्या मार्गदर्शनाखाली चाललेल्या शेतकरी मंडळाच्या कार्याचा आबांनी थोडक्यात आढावा घेतला. गेल्या म्हणजे सुरुवातीच्या वर्षाला वीस शेतकरी सभासद होते. यावर्षी पाचशे शेतकरी सभासद झाले आहेत. मंडळाने काही सभासदांना राष्ट्रीयीकृत बँकेकडून कर्जे मिळवून दिली. या विभागात पालेमोड या नावाने फार मोठ्या प्रमाणावर सावकारी केली जाते. एखाद्या शेतकऱ्याकडे दोनतीन एकर जमीन असेल तर अर्धी-अधिक जमीन लागवडीला पैसे पुरे पडत नसल्यामुळे पडीक जाते. येणाऱ्या उत्पन्नातून पालेमोड फेडता येत नसल्याने कर्जबाजारीपणा वाढत जातो. जमिनी सावकाराकडे जातात. शेतकरी असहाय्य बनतो. अशा या शेतकऱ्याला बँकेकडून कर्ज मिळवून द्यायचा कार्यक्रम शेतकरी मंडळाने घेतला. पालेमोडीविरुद्ध झगडण्याकरिता बँक ही योग्य संस्था आहे हे दाखवून दिले. गरीब अल्पभूधारक बँकेकडून कर्ज घेऊ शकतो आणि उत्पादनवाढीतून कर्ज फेडू शकतो हेही दाखवले. उत्पादनवाढ हे पालेमोड निर्मूलनाचे अस्त्र आहे हे लोकांना त्यांच्या स्वतःच्या अनुभवातून पटवले. जास्त उत्पन्न देणाऱ्या जाती, आधुनिक तंत्र आणि पीकनियोजन यावर भर दिला. तसेच आठएक महिने निश्चित पाणी-पुरवठा होण्यासाठी विहिरी खणल्या. गेल्या वर्षीच्या दुष्काळी कामातून चौदा विहिरी खणल्या, त्यापैकी बारा विहिरींना पाणी लागले. आता या पाण्याचा वापर करून रबी पिकाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. दोन हातानी केलेले काम हेच सध्या आपले भांडवल आहे हे समजून घेऊन या आदिवासींनी सपाटून कष्ट करावे असा आग्रह आपण धरीत अस-

त्याचे आबांनी सांगितले.

यावर्षी भातपीक तयार झाले असताना त्यावर लष्करी आळी ही कीड फार मोठ्या प्रमाणावर पडली. अशावेळी पीक वाचवायचे असेल तर लगोलग कापणी करणे हाच उपाय असतो. परंतु माणसे दिवाळीत गुंतल्यामुळे कापणी वेळेवर झाली नाही आणि जिथे एका एकरात पंचवीस क्विंटल उत्पन्न आले असते तिथे दोन-तीन क्विंटल उत्पन्न आले हा एका गावातला प्रकार त्यांनी सांगितला. शेतामध्ये लष्करी अळी पडल्यावर उद्भवणाऱ्या आणीबाणीचेवेळी निसर्गाचा हल्ला परतवून लावण्यासाठी एक फौज उभारून असे अरिष्ट टाळता येईल किंवा कसे यावर आपण विचार करावा असे त्यांनी सांगितले. जिल्ह्यामध्ये दगेधोपे, जाळपोळ अशा स्वरूपांची अरिष्टे उद्भवली तर मिलिटरीला बोलावून कलेक्टर शांतता प्रस्थापित करतात. तर मग लष्कर आळीसारखे पिकावरचे हल्ले परतवून लावण्यासाठी अशी काही तरी तातडीची व्यवस्था करता येणार नाही का याचा विचार आज येथे हजर असलेल्या कलेक्टर, पंचायत समितीचे सभापती आदिनी करावा असे आबांनी सुचवले.

'धान्याचा काळाबाजार जोरात चालतो आहे असे सर्वसाधारण चित्र दिसते. धान्य सरकारकडे जात नाही, गावामध्येही रहात नाही; ज्यांना धान्य विकत घ्यावे लागते अशा लहान शेतकऱ्यांची, शेतमजुरांची उपासमार होते. हे टाळण्यासाठी काळाबाजार थांबवण्याचा व गावातले जादा धान्य गावातील गरजूंना खावटीसाठी राखून ठेवायचा शेतकरी मंडळाचा आग्रह आहे. शासनाचे बरोबरीने राज्यकर्त्या पक्षाच्या तसेच विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काळाबाजार बंद करण्यासाठी रीतसर प्रयत्न केले पाहिजेत. पण होत नाहीत. हे प्रयत्न शेतकरी मंडळ करीत आहे. त्याला शासनाने सहकार्य करावे तसेच वर सांगितल्याप्रमाणे सुगीचेवेळी जमणाऱ्या जास्त धान्याचा पुढे खावटी म्हणून उपयोग करण्यासाठी धान्यकोठारे काढण्यासाठी परवाने द्यावेत असे आवाहन त्यांनी केले.

आमचा आग्रह एंड प्रॉडक्ट मिळवण्याचा आहे. आपल्याकडे विचारांचा अभाव नसतो पण कामे शेवटपर्यंत पोहोचत नाहीत असे साधारणपणे आढळते. दरिद्री आदिवासीला त्याच्या हक्कांची जाणीव देऊन पुरेसा जागा करायचा, त्याला अधिक कष्ट करायला प्रवृत्त करायचे आणि सध्याची दोन वेळा पुरेसे अन्न मिळवायची त्याची


# पूर्णिया

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

गरज तो स्वत: भागवू शकतो हा किमान आत्मविश्वास त्याच्यामध्ये निर्माण करायचा आहे...' आबांच्या भाषणातील या आशयाच्या खरेपणाची चुणूक कलेक्टरना दामखिडच्या रत्ना विहिरीवर दिसली. कोंडया भाऊ पडवळे या आदिवासीच्या शेतातील सामुदायिक विहिरीचे पाणी विजेच्या पंपाने बाजरीच्या पिकाला जात होते. ज्या वरकस जमिनीवर कधीही काही पिकेल असे वाटत नाही तीवर H B 3 या संकरित जातीच्या बाजरीचे पीक उभे होते.

कलेक्टर श्री. रंगनाथन यांनी छोटेसे भाषण केले. अत्यल्पभूधारकांनी शासनाला धान्य विकण्याचा कार्यक्रम निराळाच आहे असे ते म्हणाले. ज्यांना लेव्ही लागू आहे ते बडे शेतकरी आपले धान्य काळ्या बाजारात मोठ्या प्रमाणावर विकतात आणि ज्यांना ती लागू नाही ते शेतकरी हे धान्य शासनाला विकीत आहेत हे परस्परविरोधी चित्र आज जाणवत असल्याचे त्यांनी विशद केले. आबा करमरकर व त्यांच्या सहकाऱ्यांसारख्या जिद्दीच्या कार्यकर्त्यांकडूनच उपेक्षितांचा कायापालट घडू शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ज्य मुळे विकासाचे मूळ कार्य बाजूला राहून भलत्याच गोष्टींना महत्त्व प्राप्त होईल असे पक्षीय राजकारण या प्रकल्पात आणले जात नसल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. आणि या प्रकल्पाला मदत करण्यासाठी कलेक्टर या नात्याने आपण केव्हाहा तत्पर आहोत असे त्यांनी सांगितले.

पंचायत समितीचे सभापती श्री. मनोहर पंडित यांचे अध्यक्षीय भाषण झाले. शेतकरी मंडळाचे अध्यक्ष व आदिवासी नेते साथी काळूराम धोपडे यांनी स्वागतपर भाषण केले तर पंचायत समितीचे उपसभापती श्री. मोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

गेले पंधरा दिवस गावागावामध्ये भटकून आम्ही शेतकऱ्यांना सरकारला भात विकायचे महत्त्व पटवून देत होतो. काळूराम धोपडे, सीताराम धापसी, रामा गोवारी तसेच रमेश चौथे, शरद मांजरेकर, सू. गो. कवटकर आणि दामखिडमधून सूत्रचालन करणारे आबा या सर्वांच्या धावपळीतून आणि त्याचबरोबर नावे लिहिली तर ती ज्यांना वाचता येणार नाहीत अशा अनेक शेतकऱ्यांच्या हातभारातून आजचा कार्यक्रम उभा राहिला. सभेपूर्वी कलेक्टरनी भाताची एक गोण तोलून दामखिडच्या वजनकाट्याचा शुभारंभ केला. सभा चालू असताना भाताची पोती आणणाऱ्या बैलगाड्यांची वर्दळ चालूच होती. सभा संपल्यानंतर मी शेतकरी काय बोलताहेत ते ऐकत होतो. 'माना लेव्ही लावेल नी ही तरी मीनी सरकाराला भात दिधेल' असे विलशेत गावचा कमल्या पद्या पुंजारा मोठ्या अभिमानाने ज्याला त्याला सांगत होता. ● ● ●




# जी. ए. कुलकर्णी यांची कथा

शांता ज. शेळके

फार वर्षांपूर्वी जी. ए. कुलकर्णी हे नाव आजच्याप्रमाणे मराठी वाचकांच्या परिचयाचे झालेले नव्हते तेव्हा जुन्या 'सत्यकथेत'त जी. एं. ची एक कथा वाचल्याचे आठवते. एका मोठ्या शहरात नोकरी करणारा एक पोरसवदा तरुण. त्याला एके दिवशी अचानक पगारवाढ होते. त्याला खूप आनंद होतो. हा आनंद कुणाजवळ तरी बोलून दाखवावा असे त्याला उत्कटपणे वाटते. पण ज्याला हे सारे सांगावे असे जवळचे, काळजाच्या ओढीचे या शहरात त्याला कुणीच नसते. तो उदास होऊन आपल्या खोलीत पडून राहतो. इतक्यात त्याच्या पावलांना मृदु स्पर्श होतो. शेजार घरचे मांजराचे पिल्लू खेळत खेळत त्याच्या खोलीत आलेले असते. हा तरुण पटकन त्या पिल्लाला उचलतो. छातीशी धरतो. आणि हळूच त्याच्या कानात सांगतो, 'मन्या, आपल्याला आज पगारवाढ मिळाली बरं का.'

जी. ए. कुलकर्णी यांच्या कथा वाचताना मला त्या कथेची वारंवार आठवण होते. जी. एं. च्या कथांमधला मुख्य सूर त्या अगदी प्रारंभीच्या कथेत देखील लागलेला होता असे आता ध्यानात येते. हा सूर माणसाच्या एकाकीपणाचा, भोवतालच्या जगापासून तुटलेपणाचा आहे. नंतरच्या त्यांच्या कथांतून हा सूर अधिकाधिक चढा, होत गेलेला दिसतो. या एकाकीपणाच्या

अनेक परी जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांतून बघावयाला मिळतात. नियतीची अनाकलनीयता, माणसाची असहायता, मानवी जीवनाला व्यापून राहिलेले प्रचंड अर्थहीन दुःख, भय, क्रौर्य, अद्‌भुतता या साऱ्यांच्या कमी-अधिक, फिक्यागडद रंगांनी जी. ए. कुलकर्णी यांचे कथाविश्व सिद्ध झाले आहे. त्यांच्या कथा वाचताना मुख्यतः प्रत्यय येतो तो याच जाणीवांचा.

जी. ए. कुलकर्णी यांचे पाच कथासंग्रह आतापर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. 'निळासावळा' (१९५९) पारवा (१९६०) हिरवे रावे (१९६२) रक्तचंदन (१९६६) आणि काजळमाया (१९७२). यातल्या दोन कथासंग्रहांना राज्य सरकारची पारितोषिके मिळाली आहेत. 'काजळमाया' ला नुकतेच साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले आहे. आतापर्यंतच्या संग्रहात समाविष्ट न झालेली 'प्रवासी' सारखी प्रदीर्घ कथा किंवा या वर्षीच्या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेल्या 'एस्किलार'(मौज, दिवाळी अंक) किंवा 'कैरी' (सुगंध, दिवाळी अंक) यांसारख्या अगदी भिन्न आशयाच्या पण सारख्याच ताकदीच्या कथा यांचाही उपरोल्लेखित कथासंग्रहातल्या कथांच्या बरोबरीने विचार केला म्हणजे जी. एं. च्या कथाविश्वातील विविधता, सामर्थ्य अणि आशयसंपन्नता यांचा काहीसा अंदाज येऊ लागतो.

'गुंतवळ' 'चंद्रावळ' 'पडदा' या सुरूवातीच्या कथांनी जी. ए. कुलकर्णी यांच्या कथालेखनाकडे वाचकांचे लक्ष प्रथम वेधले गेले. 'माणूस नावाचा बेटा' सारख्या कथेत जी एं. च्या कथालेखनाचे सामर्थ्य जवळ जवळ पूर्णांशाने प्रकट झाले. तरी जी. एं. चे कथालेखन त्याच्याही आधी फार पूर्वीपासून चाललेले होते. त्यांचे काही सरस अनुवाद 'सत्यकथा' 'छंद' यांसारख्या मासिकातून प्रसिद्ध झालेले आठवतात. सागरतीरी फिरत असताना जुन्या स्मृतींचे चिंतन करणाऱ्या भाववृत्तीवर आधारित असा त्यांचा एक सुंदर ललितलेख 'छंद' मध्ये वाचल्याचे आठवते. अगदी सुरुवातीच्या जी. एं. च्या काही कथांमधून चमत्कारिक योगायोगांच्या साहाय्याने कथेचा शेवट परिणामकारक करण्याची, तिच्यामध्ये कृतक नाटयात्मता आणण्याची हौस प्रकट झाली आहे. 'वासंती' या त्यांच्या एका जुन्या कथेत शाळामास्तरणीची अपघातात मेलेली मुलगी आणि शाळेच्या वर्गात बाईंना धडा वाचून दाखवणारी चिमुरडी चुणचुणीत मुलगी दोघींचेही नाव 'वासंती'च असते. इतकेच नाही तर वर्गातली मुलगी जो धडा वाचू लागते त्याचे शीर्षकदेखील 'वासंतीचा वाढदिवस' असेच असते! 'राणी' 'भेट' यासारख्या त्या काळातल्या आणखी काही कथातूनही योगायोगाचा अवलंब करून त्यातून भडक, नाटयात्म असा शेवट करण्याची लेखकाची प्रवृत्ती दिसून येते. वस्तुतः यावेळी गाडगीळ-गोखले यांची नवी कथा मराठीत स्थिरावली होती. जी. ए. कुलकर्णी

मात्र या समकालीन नवकथेने फारसे प्रभावित झालेले दिसत नाहीत. त्यांची सुरुवातीची कथा ही अधिक भावना विवश, हळवी, अलंकारिक भाषाशैलीची हौस असलेली आणि काहीशा कृतक-नाट्यात्मकतेकडे झुकलेली दिसते. पण या कथेचे अंगभूत सामर्थ्य तेव्हाही जाणवत होते. मानवी दुःखाचा वेध घेऊ पाहाणे, जीवनाच्या असंदर्भ अर्थ-हीनतेतून जीवनाचा अर्थ शोधणे, मानवी एकाकीपणाने आणि असहायतेने व्यथित होणे हे जी. ए. कुलकर्ण्यांच्या कथालेखनामागचे प्रमुख सूत्र त्यावेळच्या त्यांच्या कथांतूनही प्रत्ययाला येत होते. जी. ए. कुलकर्णी हे आपल्या कथा-लेखनामागच्या या मूळ प्रेरणांशी इमानी राहिले. त्या कथांनी सुचवलेल्या विकासाच्या खुणांचा शोध घेत आपल्याच वाटेने ते पुढे गेले. आपली अंगभूत सामर्थ्ये त्यांनी स्वतःच धुंडाळली. या एकाग्र, तन्मय आणि अविश्रांत कलासाधनेतूनच जी. ए. कुळकर्णी या कथाकाराचे आजचे रूप सिद्ध झाले आहे. यांच्या जोडीनेच जी. एं. च्या प्रारंभीच्या कथांतून त्यांच्या आणखी दोन प्रवृत्तीही जाणवतात. त्यातली एक प्रवृत्ती रचनादृष्ट्या प्रयोग करण्याची आहे तर दुसरी प्रवृत्ती संपूर्ण कथेतूनच एक प्रतिमा उभी करण्याची आहे. 'अंधाराची पावले' सारख्या कथेतून जी. ए. कुळकर्णी यांनी अद्भुत काव्यात्म वातावरणाचा अवलंब केलेला दिसतो. 'गुंतवळ', 'माणूस नावाचा बेटा' सारख्या कथांतून (गाडगीळां-सारख्यांनी पूर्वी हाताळलेले) समूह-चित्रणाचे प्रयोग केलेले दिसतात. तर 'वहाणा', 'पडदा' यांसारख्या कथा-मध्ये संपूर्ण कथा हीच एक प्रतिमा असते. जी. एं. च्या सुरुवातीच्या या प्रयोगशील वृत्तीचा पुढे निरनिराळ्या दिशांनी विकास होत गेला. 'पारवा' संग्रहात 'रंगरेखा' या नावाने त्यांनी ज्या छोट्या छोट्या रूपकात्मक कथा लिहिल्या त्यातूनच नंतर 'प्रवासी' 'विदूषक' 'रत्न' यासारख्या आजच्या त्यांच्या प्रदीर्घ रूपकात्मक कथा विकसित झाल्या आहेत. संपूर्ण कथेतून एकच प्रतिमा उभी करण्याची लेखकाची पद्धती 'पाळणा' 'गिधाडे' 'शलॉट' 'वुती' अशा कथातून प्रत्ययास येते.

## लागेबांधे

जी. ए. कुळकर्णी यांचे कथाविश्व एका अर्थाने सीमित आहे. हे कथाविश्व महाराष्ट्र-कर्नाटकाच्या सीमेवरील एका मर्यादित भूविभागाशी संबद्ध आहे. मुंबईसारख्या बकाल महानगरीचाही ते क्वचित वेध घेते. नाही असे नाही. (हिरवी मखमल, गोरा हात) पण त्याचे खरे लागेबांधे जडलेले आहेत ते महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील विशिष्ट भूमीशीच. या भूविभागाला खास त्याचे असे एक वातावरण आहे. वास, रंग आणि चव आहे. इथल्या भाषेला किंचित कानडी वळण आणि मोड आहे. इथे जास्वंदीचा उल्लेख येतो तो 'दाशाळ' या शब्दाने. 'जोखमार' 'आसकी' (मिरची) असे अपरिचित

शब्द इथे वारंवार भेटतात. 'सुमी' या नावाला इथे 'सुम्मी' असे गोड व लाडके रूप लाभते. इथे बसवण्णाचे देऊळ आहे. काकती वेस आहे. 'धडल बंडाचार्य' 'गुडगुड गंगाई' 'वारणाई' 'नाडगोडा मास्तर' 'लंगडा गोविंदाचार्य' अशा चित्रविचित्र नावाची माणसे आहेत. 'बळी' कथेतला चौखांबी टेकडीवरचा ज्योतिर्गड आणि रखरखीत दुष्काळामुळे उघडा पडलेला हणमंतभावीचा तळ आहे. वातावरणाच्या, भाषेच्या आणि परिसराच्या या वेगळेपणामुळे जी. ए. कुळकर्णी यांच्या कथाविश्वाला समकालीन कथांपेक्षा एक वेगळे परिमाण मिळाले. पण हा वेगळेपणा विशिष्ट अर्थानेच खरा आहे. जी. एं. च्या कथांमधून मानवी दुःखाचे जे दर्शन घडते ते कोणत्याही विशिष्ट भूमीशी किंवा तिथल्या माणसांशी जखडलेले नाही. ते विराट आहे. विश्वव्यापी आहे.

या दुःखाचे एक कारण म्हणजे माणसाचे एकाकीपण. या जगात प्रत्येकजण खरोखरी एकटाच असतो. भोवतालच्या जगापासून, माणसापासून आणि निसर्गापासूनही तो तुटलेला असतो. या तुटलिकीच्या अनंत परी असतात. माणसामाणसातील तुटलेपणाची, जीवनाच्या असंबद्धतेची ही जाणीव जी. एं. च्या आधी मर्ढेकरांच्या कवितांमधून किंवा गाडगीळांच्या काही कथांतूनही प्रकट होत होती. 'सलग जमेना एक भावना, 'हलो हलो'ला हलकट उत्तर' असे जगाचे स्वरूप मर्ढेकरांना जाणवले होते. गाडगीळांच्या काही कथांतून हीच भावना तीव्रतेने व्यक्त झाली आहे. पण जी. एं. च्या कथांतून माणसाचे एकाकीपण ज्या भयावह, परिपूर्ण आणि खोल जाणिवेने प्रकट होते तसे ते पूर्वी कधी झालेले नव्हते. हे दर्शन मन सुन्न करून टाकणारे आहे.

'गुंतवळ' कथेत मुदवाडसारख्या खेड्याजवळ धरणाच्या कामानिमित्त जमलेली असंख्य माणसे असतात. पण त्यातला प्रत्येकजण अगदी एकटा, आपले एकटचाचे खाजगी दुःख उरात चिघळत ठेवून जगत असतो. 'बळी'मधली दगडांनी ठेचून मारली जाणारी वेडी अमाशी आणि विठा जोगतिणीवर प्रेम करणारा, ती धुंद आठवण मनात बाळगून अमाशीचे चोरटे पितृत्व जोपासणारा सखाराम पाटील दोघेही आपापल्या परीने एकाकीच असतात. 'बाधा'मधल्या रमेला लग्नापूर्वी क्षणमात्र मन चाळवून जाणाऱ्या दिवाकरावरील प्रेमाची बाधा होते. त्या क्षणीच भोवतालच्या जिवंत जगाशी तिचा सर्व संबंध तुटतो आणि जुन्या प्रेमाच्या स्मृतीशी निगडीत होऊन पाण्यात बुडून मरणे हेच तिच्या हातात शिल्लक उरते. तिच्या लेखी मरणाचा क्षण हा मुक्तीचा, सुटकेचा क्षण बनतो. प्रिन्सिपॉल ठकार हे आपल्या अतिरिक्त सूक्ष्म चोखंदळ सौंदर्यासक्त वृत्तीमुळे बायकोशी, मुलाशी कधी समरस होऊ शकत नाहीत. मग ते आपल्याभोवती सुंदर चित्रांचा, पुस्तकांचा, काव्याचा कोश निर्माण करून त्यातच एकाकी जगत

राहतात. जिवंत माणसाकडे पाठ फिरवून ते निर्जीव कलाकृतींच्या तुकड्यातुकड्यांनी बनवलेल्या खाजगी स्वतंत्र विश्वात समाधान शोधतात.

## आकृती की गिचमिड ?

या एकाकीपणातून मुक्त होण्यासाठी माणसे जे उपाय योजतात ते देखील किती क्षुद्र, हास्यास्पद, केविलवाणे असतात. कुणी अचानक श्रीमंतीची धुंदी शोधतो. (गिधाडे) कुणी एखादी कामपूर्तीच्या क्षणिक उन्मादात बुडी मारून आपल्या स्तनामध्ये लॉकेट रुतवणाऱ्या घट्ट मिठीचा आश्रय घेते. (माणूस नावाचा बेटा) कुणी गिधाडासारखी दुसऱ्याच्या दुःखात चोचनखे रुतवून आपल्या दुःखावर सूड घेतो. (गिधाडे) तर कुणी घटकेच्या जुगारावर सारे आयुष्य उधळून देतो. (हिरवी मखमल, गोरा हात) जीवनाच्या सागराची प्रचंड लाट नागासारखी उंच फडा काढून उभी असते आणि तिच्या जीवघेण्या छायेखाली (होकुसायच्या 'लाटा' चित्रातल्याप्रमाणे) ठिपक्यासारखी असहाय छोटी छोटी माणसे आपापले स्वतंत्र इवलेसे सुखदुःख सांभाळीत मरणाच्या दाढेत क्षणाचा आनंद धुंडाळतात.

अशा या एकाकी माणसाला दुसऱ्या माणसाचा तर आधार नसतोच पण भोवतालच्या मानवी व्यवहाराचा किंवा त्याच्या जरा पलिकडे असलेल्या निसर्गाचीही त्याला सहानुभूती लाभत नाही. मानवी जीवनाची असंबद्धता, संदर्भशून्यता जी. ए. कुलकर्णी पुढीलप्रमाणे चित्रित करतात– 'कचऱ्याच्या बुट्ट्या ओढून मोटारीत घालणारी अल्युमिनियमच्या बांगड्यांची बाई, शिते चिवडणारा लठ्ठ आंधळ्या बोटांचा भिकारी, डोक्यावरून काळी लेस घालून चर्चकडे निघालेली सफरचंदी चेहऱ्याची नीटनेटकी मुलगी; उघड्या गाडीत तोंड वासून पडलेले चकचकीत चांदीसारखे मासे; चौथ्या मजल्यावरून रेलून खाली पाहणारी उफाड्याची तरुणी; ट्रामचा दांडा सांध्यावर घासताच खाडकन् उडणारी हिरवट निळी ठिणगी आणि मागे खूप उंच चढलेल्या इमारतीच्या सिमेंटच्या धुराड्यावर गळा फुगवून एकटेच घुमत बसलेले पांढरे शुभ्र कबूतर ..' (हिरवी मखमल, गोरा हात) किंवा याच कथेत लेखक फूटपाथवर टाकलेल्या, एकत्र नांदणाऱ्या ढीगभर पुस्तकांचे वर्णन करतो... 'पाककला, आरती संग्रह, राणा प्रताप, दूधव्यवसाय, अस्सल कोकशास्त्र...' कशाला काहीच संबंध नाही. पण साऱ्यांची किंमत सरसकट आठ आणे.

अत्यंत अर्थशून्य, अविचारी रीतीने माणसे एकत्र येत राहतात. त्यांचा परस्परांशी काहीही संबंध नसतो. 'आपण सारी एकत्र कशाला आलो? आपला यांचा काय संबंध आहे? आपण सारी एका विशाल अज्ञात आकृतीतील रांगोळीचे ठिपके असूनही, आकृती? की नुसती हजार तोंडांच्या अजस्र बुळबुळीत गांडुळाप्रमाणे वळवळणारी वेडी अर्थहीन गिचमीड? वाऱ्याने निर-

निराळ्या धाग्यांचा पुंजका एकत्र गोळा व्हावा, त्या गुंतवळीतून एक धागा बाहेर जातो– दुसरा येतो, याखेरीज संबंध नाही, दोन धाग्यांत आतड्याची ओढ नाही–ओढ नाही.' हा संदर्भशून्यतेचा, असंबद्धतेचा शाप संपूर्ण मानवी जीवनाला व्यापून राहिलेला आहे. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांतली सर्व माणसे ही अशी एकाकी जीवन जगत असतात. भोवतालचा निसर्ग कथेमध्ये येतो तो देखील हा एकाकीपणा अधिक गडद करीतच येतो. हा निसर्ग थंड, अलिप्त उदासीन नजरेने, काहीशा उपेक्षेने, काहीशा तुच्छतेने माणसांचे खुजे, खुरटे, क्षुद्र व्यवहार बघत राहतो. 'बळी' मधील कोरडी हणमंतभावी वेड्या अमाशीला दगडांनी ठेचल्यामुळे येणारे मरण शांतपणे पाहते. 'रात्र झाली गोकुळी'मध्ये वारणाईचे सबंध कुटुंब आपापल्या स्वतंत्र व्यथा वेदनांनी रात्रभर जागत–जळत असते. 'पण पहाट झाली काय, न झाली काय, याची परवा नव्हती फक्त दोघांना. सतत हालणारा चाफा आणि त्याखाली साचलेले, कधीच न हालणारे हिरवट काळे पाणी.' 'मुखवटा' कथेतला पितळी मुखवटा शांत, निरामय, निर्विकार उघड्या डोळ्यांनी सारे काही बघत राहातो. बसवण्णाच्या देवळांतले दगडी कासव न हालता न चालता सर्व मानवी दुःखांचे निमूट साक्षित्त्व करीत असते. 'ठिपका' कथेतले मंदिर आपल्या अंतिम रहस्याचा वेध कुणालाही घेऊ देत नाही. ते सारखे गरगर फिरते. आणि आपल्या दारातून आत येऊ बघणाराला तिरस्काराने दूर ढकलून देते. 'स्वप्न' कथेमध्ये वादळात अनेक माणसे मरून जातात पण 'आभाळातून अभिषेक पात्रातल्याप्रमाणे कालगतीचे थेंब ठिबकत राहतात आणि त्या प्रत्येक ठिपक्याबरोबर नियतीचा सहस्ररत्न मोरपिसारा चांदण्या चमकावत, लहान मोठा होत निर्विकारपणे सारे पाहात राहातो.'

अशा गडद दुःखाने साकळलेल्या मानवी जीवनात एक ओलाव्याची हिरवळ असते ती बाळपणाच्या स्मृतींची. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांतल्या काही कथा आत्मचरित्रात्मक आहेत. वास्तवाच्या भयानक दर्शनाने व्यथित होणारे लेखकाचे मन बाळपणाच्या हिरव्या ओल्या आठवणीत रमून जाऊ पाहाते. या कथांना पूर्वस्मृतींनी जाग्या होणाऱ्या हुरहुरीचा Nostalgia चा नाजूक हळवा गंध आहे. 'तुती' 'वाहाणा' किंवा 'सुगंध' दिवाळी अंकात अलिकडेच प्रसिद्ध झालेली 'कैरी' या अशा प्रकारच्या कथा होत. या कथांतून लेखकाचे बाळपण तुकड्यांतुकड्यांनी अस्पष्टपणे प्रकट होताना दिसते. त्याच्या चित्रकलेच्या साधनेचे, संगीतसाधनेचे ओझरते उल्लेख येऊ लागतात. जुन्या घराच्या, आईच्या, नानांच्या, श्रीपुमामाच्या, कृष्णी गायीच्या आणि 'पितळी तोरणाचे घुंगुर वाजावेत' तसे हसू हसणाऱ्या 'सुम्मी' या वहिणीच्या आठवणी येतात. या कथा आपापल्या परीने स्वतंत्र असल्या तरी

काही व्यक्तिरेखा त्यातून पुन्हा पुन्हा उमटत जातात आणि या आठवणींचे एक सलग सूत्र त्यांना लाभते. पण हे बाळवयही पूर्ण निरामय नाही. तेथेही 'राधी 'चा भयानक मृत्यु आहे. हसऱ्या 'सुम्मी 'ला गोल विहिरीने गिळून टाकले आहे. कृष्णी गाय मेल्यानंतर चौकटीला बडवणारी, खटखट आवाज करणारी तिची निर्जीव शिंगे आहेत. यामुळे हे बालपण अकाली प्रौढ होते. शहाणे समजूतदार होते. 'तुती अगदी पिकून मऊ जांभळी झालेली असते ना, ती खाऊ नये...तुती थोडी कच्चीच असावी...मग तुती बराच वेळ ध्यानात राहते. ' हे मन उदास करणारे ज्ञान त्याला होते.

जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांतून नाना तऱ्हेची माणसे भेटत राहतात. त्यांच्या परस्पर संबंधातून सुखदुःखाचे वेडेवाकडे आकार उमटतात. अर्थशून्यतेतून अर्थशून्यता वाढत जाते. बापू काळूस्कर क्षणिक मोहाच्या आहारी जातो आणि बँकेतले पैसे पळवून चार दिवस भिकार चैन करतो. परिणामी त्याची लहान अशक्त वाळलेली मुलगी शैलू इतर मुलांमधून बहिष्कृत होते. तिला कुणी आपल्यात खेळायला घेत नाही. 'रात्र झाली गोकुळी' मधली शकी आपल्या बहिणीची–दुर्गीची–काकणेच नव्हेत तर तिचा प्रियकरही हक्काने हिरावून घेते आणि दुर्गी असहाय्यपणे ते दुःख सोसते. 'बळी' कथेतला सखाराम विठा जोगतिणीशी संग करतो आणि अमाशी जन्माला येऊन फुटक्या बेडकीसारखी दगडांनी चेचली जाऊन मरते. कुणी व्याभिचार करते. कुणी त्याची शिक्षा भोगते. कुणी क्षणाचा उन्माद अनुभवते, कुणी जन्मभर त्याचे परिणाम सोशीत राहाते. कुणाच्या एका निरर्थक वेडासाठी दुसऱ्या कुणाला जन्माचे बळी जावे लागते. दुःखाचा गुणाकार कधी संपत नाही. तो वाढतच जातो.

## कथानकप्रधान

जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांचा विचार करताना रचनादृष्टचा एक गोष्ट ध्यानात घेणे आवश्यक आहे. नवकथेने जी. ए. प्रभावित झालेले दिसत नाहीत. उलट काही बाबतीत ते अगदी वेगळे राहिले आहेत असे जाणवते. नवकथेने कथानकाचा ठरीव साचा मोडला आणि कथेच्या मुक्त विकासाला तिने अनंत वाटा मोकळ्या केल्या हे खरे, पण परिणामी कथा इतकी 'कथानकशून्य' झाली की ती जणू आपला देहच हरवून बसली. सूक्ष्माचा शोध घेता घेता भव्यतेचे, विराटपणाचे म्हणूनही एक सौंदर्य असते ते तिने कुठेतरी हरवूनच टाकले. जी. एं.च्या कथांचे एक वैशिष्टय म्हणजे त्या सांगून सवरून कथानक प्रधानच आहेत. त्यांच्या कथेला ठसठशीत कथानक असते. ते पेचदार, बांधेसूद असते. त्यात बरेच काही घडत जाते. या कथानक प्रधानतेमुळे जी. एं.च्या कथेला रक्तामासाचा हाडाचा भरभक्कम देह लाभतो आणि समकालीन फिकट 'ॲनिमिक' नवकथेपेक्षा ती कितीतरी जिवंतपणे आपले मन वेधून घेते. 'कथानक नसले

तरच कथेला नवता प्राप्त होते ' या भाबड्या समजुतीला जी. एं. ची कथा हे एक समर्थ आव्हान आहे.

जी. ए. कुलकर्णी यांची समर्थ भाषाशैली आणि त्यांची प्रतिमायोजना यांचा विचार त्यांच्या कथेच्या संदर्भात केलाच पाहिजे. प्रतिमांचा इतका सूचक समर्थ आशयसंपन्न आणि विकासशील वापर समकालीन कोणत्याही लेखकाने (किंवा कवीनेही) केलेला आढळत नाही. शीर्षकांतून एक प्रतिमा वापरून तिच्या द्वारा संपूर्ण कथेचेच एक प्रतीकात्म दर्शन जी. ए. घडवतात. (तुती, गिधाडे, पाळणा, रातराणी, नाग) प्राणी, पशुपक्षी, निसर्ग यांचाही वापर ते प्रतिमांसाठी करतात. ' बळी ' कथेतली फुटलेली बेडकी, ' गिधाडे ' कथेत वारंवार येणारी गिधाडाची सावली, ' राक्षस ' कथेतील खरखरीत लोकरी अंगाचे केसूरकिडे व लठ्ठ अळ्या, ' रात्र झाली गोकुळी ' मधली अंगात हाडे नसल्यासारखी मऊ रेशमी, सफाईदार हालचालीची अलिप्त मंजू मांजरी—या प्रतिमा पहाव्यात. प्रतिमायोजनेइतकेच काव्यात्म शैलीचे वजनही जी. एं.च्या कथातील आशयाला पेलून धरते. या शैलीला एक आगळे चित्रदर्शित्वही लाभले आहे. जी. एं. ची भाषा बहुरूपी आहे. ती कधी काव्यात्म होते. कधी कोरडी बनते. कधी प्रतिमांनी खचून झगमगू लागते तर कधी उपहासाने दाहक होते. अलिकडच्या काही कथांतून तिने अद्भुताचा, लोकसाहित्यातील भाषेच्या वळणाचांही अवलंब केलेला दिसतो. जिवंत व्यक्तिचित्रण आणि पेचदार घटनाप्रसंग यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी विणले गेलेले जी. एं. च्या कथांचा पोत घट्ट, ठाशीव असतो आणि त्यावर या प्रतिमाखचित, समृद्ध, संपन्न भाषेची बारीक भरगच्च नक्षी उमटत जाते. जी. एं. च्या कथेत तपशीलही भरपूर येतो. पण तो अकारण येत नाही. तो कथेच्या आशयाला संपन्न करतो. तिच्या अंगी लागतो.

अलिकडच्या काळात जी. एं. च्या कथेने एक नवे वळण घेतले आहे. जीवनाच्या गाभ्याला स्पर्श करण्याचा, तेथील मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा ती प्रयत्न करीत आहे. ' प्रवासी ' ' विदूषक ' ' ठिपका ' यासारख्या कथातून ती पारंपरिक लोकसाहित्याच्या मार्गाने या प्रश्नांचा वेध घेऊ बघते तर ' ऑर्फियस ', ' एस्किलार 'सारख्या कथांतून ग्रीक मायथॉलॉजी, ग्रीक ट्रॅजेडी सारख्या श्रेष्ठ वाङ्मयीन परंपरेतल्या संकल्पनांचा नवा चैतन्यपूर्ण वापर करते. मराठी कथावाङ्मयात जी. एं. ची कथा संपूर्णपणे पृथगात्म आहे. आपल्या कलाप्रवासातला केवढा तरी पुढचा टप्पा तिने गाठलेला आहे. तिने घडवलेले जीवनदर्शन खोल, सूक्ष्म, व्यामिश्र असे आहे. केवळ ' कथा ' या माध्यमाचा जी. ए. इतका शोध आजवर दुसऱ्या कुठल्याही मराठी कथाकाराने घेतलेला नाही. या वाङ्मयप्रकाराचे इतके सर्वस्पर्शी सामर्थ्य अजून कुणीही अजमावून पाहिलेले नाही. म्हणूनच मराठी कथेच्या परंपरेत ' जी. ए. कुलकर्णी ' हे नाव एक वेगळे सामर्थ्य घेऊन उभे आहे. उभे राहील. ● ● ●

मध्यंतर

# संध्याछाया

पुष्पा भावे

अलिकडे नाटक सोडता अन्य साहित्य-व्यवहार इतका मंदावला आहे की जवळजवळ प्रत्येक लेखकाला आपण नाट्यमाध्यम हाताळले पाहिजे, किंबहुना नाट्यमाध्यम योजणे हे आज अपरिहार्य आहे, असे वाटू लागले आहे. यामुळेच पुंडलिकांसारखा मातब्बर कथाकार किंवा जयवंत दळवींसारखा कथाकादंबरीकार नाट्यलेखनाकडे वळला आहे.

जयवंत दळवींची दोन नाटके—'सभ्य गृहस्थहो' आणि 'संध्याछाया'—काही आठवड्यांच्या अंतराने रंगभूमीवर आली. 'संध्याछाया'च्या निमित्ताने, अलीकडे नाट्यवर्तुळाच्या बाहेर फेकले गेलेले दोन कलावंत पुन्हा रंगमंचावर आले आणि आपल्या अभिनय सामर्थ्याचा प्रत्यय देऊन गेले. 'संध्याछाया'चे दिग्दर्शन माधव वाटवे यांनी केले असून त्यातील प्रमुख भूमिका माधव वाटवे आणि विजया मेहता यांनी केल्या आहेत. 'संध्याछाया' या नाटकाचा मूल अनूभव एका वृद्ध जोडप्याचा केविलवाणा एकाकीपणा हा आहे. हा अनुभव व्यक्त करणारे नाटक वाटवे-मेहता यांच्याकडे जावे हे अपरिहार्य होते. कारण एकेकाळी मराठी प्रायोगिक रंगमंचाच्या मर्मस्थानी असणाऱ्या 'रंगायन' या संस्थेतर्फे या दोघांनी आयेनेस्कोच्या 'चेअर्स' या प्रसिद्ध नाटकाचे 'खुर्च्या' हे मराठी रूपांतर सादर केले होते. 'खुर्च्या' या नाटकाचे स्वरूप विशुद्ध काव्यासारखे, अनुभव निखळरूपात व्यक्त करणारे आहे. हे स्वरूप 'कथा पाहायला' येणाऱ्या मराठी प्रेक्षकांना मानवणे शक्य नव्हते. ज्या काळात 'खुर्च्या' सादर झाले त्याकाळात प्रायोगिक वर्तुळातल्या प्रेक्षकाचीही इतकी तयारी नव्हती. त्यामुळे 'रंगायन'च्या अपयशाचे उदाहरण म्हणून, क्वचित कुचेष्टेनेही, 'खुर्च्या'कडे बोट दाखवले गेले. वस्तुतः आयेनेस्कोचे 'खुर्च्या' हे नाटक म्हणजे आधुनिक अभिजात नाटक मानले जाते. अवकाशाच्या पोकळीत निर्माण होणाऱ्या नाट्यमाध्यमाची नेमकी जाण या नाट्यकृतीतून व्यक्त होते. पण आम्ही हा अनुभव आमच्या मातीतला नाही असे करंटे स्पष्टीकरण देऊन त्याकडे पाठ फिरवली. आणि आता दशकानंतर तसाच अनुभव समकालीन तपशीलाच्या कलाकुसरीने सजवून मांडला जात आहे तो स्वीकारायला आम्ही तयार झालो आहोत. असो. या निमित्ताने माधव वाटवे आणि विजया मेहता यांची अभिनय कला विस्तृत प्रेक्षकवर्गापर्यंत पोचेल.

जयवंत दळवींच्या 'संध्याछाया' या नाटकाचा जीव खरे तर एकांकिकेचा आहे—दोन अंकी रूपात तो ताणल्या-

सारखा वाटतो. वृद्ध एकाकी जोडप्याचा एकाकीपणा हा अनुभवच त्या स्वरूपाचा आहे असे स्पष्टीकरण देण्यासारखे आहे—तरीसुद्धा असे वाटते की दुसरा अंक स्पष्टीकरणाच्या स्वरूपाचा आहे. असे स्वरूप प्राप्त होण्याचे कारण नाटककाराच्या हेतूतच आहे. वृद्ध जोडप्याच्या एकाकीपणावर 'ब्रेनड्रेन'च्या प्रश्नाचे कलम करण्याचा यत्न नाटककाराने केला आहे. वरवर पाहता, हे दोन प्रश्न सहजपणे एकत्र येतील असे वाटते. कारण परदेशी गेल्यामुळे, प्रसंगी परधर्मीय स्त्रीशी विवाह केल्यामुळे, मुले आई-वडिलांना दुरावतात हे खरे असले तरी ब्रेनड्रेनची जशी सामाजिक चिकित्सा दळवींना अभिप्रेत आहे तशी ती या मूलतः भावनात्मक अनुभवात मिसळून जाऊ शकत नाही. म्हणूनच नाटकाच्याअंती येणारी आपल्या देशाची व परदेशाची तुलना कोरडी व हास्यास्पद वाटते. तसेच या जोडप्याचा दुसरा मुलगा विमानदलात असणे आणि तो युद्धात जाणे हेही फार ओढूनताणून आणलेल्या योगायोगासारखा—मेलोड्रॅमॅटिक आहे. 'संध्याछाया'तल्या वरील मर्यादा वजा करता, अनेक वर्षांच्या सहवासातून निर्माण झालेले वृद्ध पतिपत्नीतील हृद्यनाते, एकाकीपणात आठवणींची सोबत शोधण्याचा—तरुण आवाजाची सोबत शोधण्याचा—त्यांचा यत्न, काहीतरी करीत राहण्याचा खटाटोप, अतिसहवासातून निर्माण होणारे खटके—एकमेकाची जपणूक, अनुभवाचे विविध रंग दळवींनी निव्वळ भाषेतून व्यक्त केले आहेत. अशा जोडप्याचा अनुभव व्यक्त करण्यासाठी शब्दापेक्षाही रोजच्या जगण्याचे क्षुल्लक वाटणारे तपशील अधिक महत्त्वाचे हेही त्यांनी नेमके ओळखले आहे.

नाटकातला प्रत्येक क्षण आणि क्षण जिवंत करणारे दिग्दर्शन या प्रयोगाला लाभले होते. दिवसाचा प्रत्येक क्षण ज्या जोडप्याला कंटाळवाणा वाटतो आहे त्या जोडप्यातील प्रत्येकाची प्रत्येक हालचाल म्हणजे काम शोधण्याचा निरर्थक प्रयत्न आहे हे माधव वाटवे आणि विजया मेहता यांनी नेमकेपणाने प्रेक्षकांपर्यंत पोचवले. दोघांपैकी विजयाबाईंना संवाद अधिक होते. त्यांनी आवाजातून वृद्धत्वाने आलेला थकिस्तपणा, कंटाळवाणेपणातून आलेला भांडखोरपणा, पतीच्या अपेक्षित प्रतिक्रियानी येणारे मिस्किल हसू या विविध छटा अशा काही व्यक्त केल्या की त्यामुळे केवळ वृद्ध स्त्री उभी न राहता एक वृद्ध स्त्री डोळ्यासमोर आली. विजयाबाईंच्या विविध भूमिकातील 'यशोदा'मधील मावशी, 'मना सज्जना'मधील नाटकवेडी विसरभोळी मध्यमवयीन स्त्री आणि 'संध्याछाया' व 'खुर्च्या'मधील वृद्धा ही रूपे डोळ्यासमोर आणता भूमिकानुरूप आपल्या शरीराकृतीत बदल करून भासविण्याची त्यांची कला, वाक्योच्चाराची विरचना बदलण्याचे त्यांचे कसब, कौतुकास्पद वाटते. ज्या त्यांच्या आंग्ल उच्चारांवर नेहमी आक्षेप घेतले जातात तेही अशा प्रसंगी लुप्त होतात. प्रस्तुत भूमिकेतही क्वचित प्रसंगी होणाऱ्या आंग्ल धर्तीच्या 'अ-आ-ओ'चे उच्चार वगळले तर त्यांची

वाणी खास घरगुती वळणाची होती. मुलाविषयीच्या आणि पतीविषयीच्या रागालोभाच्या छटा, पराजित मनोवृत्तीतही डोकावणारी जीवनेच्छा, याचे अत्यंत हृद्य दर्शन विजयाबाईंच्या अभिनयातून घडले. माधव वाटव्यांनी उभा केलेला म्हातारा म्हणजे निःशब्द अभिनयाच्या सामर्थ्याचा पुरावा होता. रंगमंचावरील प्रत्येक क्षण ते कसोशीने पण सहजपणाने जगत होते. एखाद्या अनुभवाविषयीच्या स्त्रीच्या प्रतिक्रिया आणि पुरुषी प्रतिक्रिया एक नसतात, हे वेगळेपण वाटव्यांनी नेमके प्रस्थापित केले. मुलांनी आपल्याला नाकारले ही विद्धता ते फार तर पत्नीपाशी व्यक्त करीत–मुलगा समोर आला की दुःखाच्या पाकळ्या मिटून सुन्न बसत, प्रसंगी क्रोधापाठीमागे ही विद्धता लपवीत. हे म्हातारे व्यक्तित्त्व उभे करताना ज्या लकबी त्यांनी निर्माण केल्या त्या दिखाऊ लकबी न उरता व्यक्तिमत्त्वात विरघळून गेल्या. 'ससा आणि कासव' पासूनच माधव वाटव्यांच्या अभिनयकौशल्याचा प्रत्यय आला होता. पण पुढे पुढे त्यांच्या व्यक्तिगत लकबी–विशेषतः मानेची शीर ताणेतो मान तिरपी उंचावून वाक्यार्थ टिपेत उच्चारण्याची लकब–कंटाळवाणी वाटू लागली होती. प्रस्तुत भूमिकेत पुनः एकदा या लकबीतून मुक्त होऊन नवी निर्मिती करण्याचे त्यांचे सामर्थ्य प्रत्ययाला आले. अतिशय लोभस असे व्यक्तिमत्त्व त्यांनी निर्माण केले.

माधव वाटव्यांच्या दक्ष दिग्दर्शकी नजरेखाली 'संध्याछाया'चा प्रयोग अत्यंत नेटका झाला. अभिनय आणि पदरचना तर कल्पक होतीच, पण रस्ता ज्या कल्पकतेने त्यांनी (व नाटककाराने) वापरला ती कौतुकास्पद होती. एकाकी आयुष्य कंठणाऱ्या जोडप्याने रस्त्यावरील वरातीच्या आनंदात सहभागी होणे, मुलाचा विवाह-संसार याची स्वप्ने अशी साजरी होणे हा भाग अत्यंत हृद्य होता आणि म्हणूनच या पार्श्वभूमीवरील आईचे, आपला विमानदलातील मुलगा येतो आणि तेवढ्यात रस्त्यावरून प्रेतयात्रा जाते हे दुःस्वप्न (Night-mere) अधिक करुण वाटले. हे दृश्य इतके भयावह व बोलके होते की त्यानंतर मुलाच्या मृत्यूची प्रत्यक्ष बातमी येणे व्यर्थ वाटले. दूरध्वनीवरील संवाद हाच या वृद्धांचा जगाशी संपर्क हेही सूत्र या प्रयोगात चाणाक्षपणे वापरले गेले. छोटी नंदिता आरस, प्रदीप वेलणकर, रवी रानडे आणि विनय आपटे यांनी समंजस साथ दिली. [ विनय आपटे अजूनही नवशिक्या नटासारखे हात फार अवघडलेपणे वापरतात आणि दन्त्य उच्चार नसलेल्या ठिकाणी दातांना जिभेचा स्पर्श करतात ] या निर्मितीला अशोक रानड्यांसारख्या कल्पक संगीतकाराचे संगीत लाभले आहे. परंतु या नाटकात तसा त्यांना फारसा वाव नव्हता. प्रकाश मळकर्णेकरांची प्रकाशयोजना आणि नेपथ्य नाट्यपोषक होते. 'संध्याछाया' म्हणजे विजया मेहता आणि माधव वाटवे यांच्या संवेदनाक्षम, कल्पक अभिनयाचा पुनः प्रत्यय देणारा नाट्यप्रयोग–ज्यांनी यापूर्वी या दोघांचा अभिनय अनुभवलेला नाही त्यांनी तर नव्याने अवश्य घेण्यासारखा ! ● ● ●



सांगायलाच्
हवं का?
SATHE
MALTeX
BISCUITS
SATHE
MALTeX
BISCUITS
ताजी, कुरकुरीत व
रुचीला आगळीच-
वा! ही तर
साठे माल्ट एक्स
बिस्किटेच!
ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता
माल्टमुळेच या बिस्किटात आहे.
पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्ये असलेली
माल्ट एक्स बिस्किटे कितीही खा पुन्हा पुन्हा
खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच!
साठे
बिस्किटे
आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा!
heros'-SBC-49C MAR

## मध्यमुंबई निवडणूक : पृष्ठ ८ वरून

महागाई वाढली हे काँग्रेसचे व त्यांच्या सरकारचे विधान अत्यंत अर्धवट व खोटे आहे. महागाईचे मुख्य कारण म्हणजे सरकारी बँकांचा पैसा भांडवलदार, काळाबाजार व साठेबाजी ह्यात ओतत आहेत. आणि हे सारे इथे काँग्रेस पुढाऱ्यांच्या आशीर्वादानेच चालू आहे. साखरेचे उत्पादन पूर्वीपेक्षा खूप वाढले आहे; काँग्रेसी-सरकारी हिशोबाप्रमाणे साखरेच्या किमती उतरायला हव्या होत्या. प्रत्यक्षात त्या वाढवताना दिसताहेत... रशियाचा २० लाख टन गहू देशात आला. तरी गव्हाचे दुर्भिक्ष आहेच. किमतीही वाढताहेतच...यंदा अन्नधान्याचे पीक भरपूर आहे. पण त्याचा परिणाम भावांवर दिसत नाही, पुरवठ्यात दिसत नाही. हे अन्नधान्य जाते कुठे?... रिझर्व बँकेचे ॲडव्हान्सेस अशाच मंडळींना मिळतात. तिथेही धरबंध नाही....सरकारी कारखाने तोट्यात चालतात. ह्या दोष पब्लिक सेक्टर विचारसरणीचा नाही तर ती राबवणाऱ्या भांडवलशाही धार्जिण्या काँग्रेसचा आहे. हे कारखाने चालवायला मदत घेतली जाते टाटा-बिर्ला-साराभाईंकडे मोठ्या हुद्द्यांवर काम करणाऱ्या मंडळींची.

ह्या मंडळींची सामाजिक मतं जाहीर असता त्यांच्या तर्फे 'पब्लिक सेक्टर' व्यवस्थित कसा चालवला जाणार तेच समजत नाही. आमचं सहकार्य घ्यायला शासन तयार नाही. आमचं आवाहन आहे सरकारी कारखाने आमच्या ताब्यात द्या आम्ही ते सुरळीत चालवून दाखवतो.

सरकारजवळ म्हणे पैसा नाही. कारण सरकारी कारखाने, रेल्वे वगैरे नुकसानीत चालतात. रेल्वे, कोकणातच काय पण जिथे आहे तिथे सुद्धा वाढू शकत नाही! पण मग मुंबईतील भांडवलदारांच्या मोटारी लवकर व सरळ जाव्यात म्हणून रस्ते व मलबार-हिलचे बोगदे आणि समुद्राच्या भरण्या करण्यासाठी शेकडो कोटी रुपये महाराष्ट्र सरकार कुठून आणते? गरिबाचे प्रेत पुरायला तांब्याचा पैसा नाही, पण भांडवलदारांच्या पंचवीस मजली राजमंदिराला लावायला मात्र सरकारजवळ सोन्याचा साठा भरपूर आहे. अशाच एका नव्या भरणीच्या राजमंदिरात मुंबईच्या तथाकथित पुरोगामी काँग्रेस अध्यक्षांचे कंदील झळकत आहेत! आमच्या गिरणी कामगारांच्या पगार वाढीच्या मागणीला ह्याच 'पुरोगामी' काँग्रेस अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली संघाने विरोध केला आहे. दिल्ली, कलकत्ता, कानपूर, मद्रास इत्यादी ठिकाणी कामगारांनी एकजुटीचे लढे देऊन हंगामी पगारवाढी मिळविल्या. पण पुरोगामी बुरखा घेऊन मुंबईच्या काँग्रेस पुढाऱ्यांनी कामगारांची बाजू घेतली नाही. सरकारनेही तेच केले. ह्या निवडणुकात शिवसेनेशी करार करून मुंबई काँग्रेसने आपल्या पुरोगामित्वाचा बुरखा फाडून

टाकला आहे हेही बरेच झाले. ह्यातून खरे पुरोगामी व बहुजन समाजवादी कोण व भांडवलदारांचे पाठिराखे कोण हे जनतेच्या लक्षात येईल. अशा तऱ्हेच्या भ्रष्टाचारी, देशघातक व केवळ भांडवलदारांनाच पोषक अशा कारवाया सर्वत्र चालू आहेत. त्याचे खरे प्रवर्तक राजकीय छत्राखाली दडून बसलेले असतात. हीच मंडळी इंदिराजींच्या काही पुरोगामी व जनताभिमुख धोरणांना सुरुंग लावतात. अशा मंडळींचा सगळ्यात मोठा अड्डा म्हणजे महाराष्ट्र सरकार आणि बी. पी. सी. सी. इंदिराजींच्या धोरणांना पाठिंबा देत असताना मुंबई काँग्रेसला आम्ही विरोध करीत आहोत त्यामागची भूमिका ही अशी आहे.

आमचा मुंबई काँग्रेसला विरोध आहे. ७१ मध्येही आम्ही सर्वत्र काँग्रेसला पाठिंबा दिला तरी, भांडवलदारांच्या ताबेदारीतील मुंबई व महाराष्ट्र काँग्रेसला विरोधच केला. आजही हे चित्र बदललेले नाही. म्हणून आजही हा सामना भांडवलदार विरुद्ध कामगार असाच आहे.

'बेळगावचा प्रश्न सत्ताधारी पक्षाने स्वतःच्या हाती काही खेळणे पाहिजे म्हणून कुजवत ठेवला आहे. ह्या प्रश्नाला ह्या निवडणूकीत काही विशेष महत्त्व आहे असे मला वाटत नाही. म्हणूनच म. ए. समितीच्या उमेदवारीच्या समाजवादी सूचनेला आम्ही फारसे अनुकूल नव्हतो. बेळगावचा प्रश्न पुढे करून सायनाक किंवा ठाकूर ह्यांची उमेदवारी जाहीर झाली असती तर सध्याची महागाई, अन्नधान्य टंचाई वगैरे जीवन नकोसे करून टाकणारे जिव्हाळ्याचे प्रश्न मागे पडले असते. व ते सरकारच्याही फायद्याचे झाले असते. अर्थात बेळगावचा प्रश्न त्वरित सुटला पाहिजे ह्यासाठी आम्हीही प्रयत्नशील आहोतच. हा प्रश्न मिटू न शकणारा मुळीच नाही. पण सरकारलाच आपल्या स्वार्थासाठी तो कुजत ठेवायचा असतो.

इथल्या झोपडपट्ट्या, कोसळणाऱ्या चाळी ह्या बाबतही जमिनीचे राष्ट्रीयीकरण हा मूलभूत तोडगा आहे. त्यामुळ जागांच्या भावांवर नियंत्रण राहील व तेणेकरून हे राहत्या जागांचे प्रश्न सोडवता येतील. झोपडपट्टी सुधार समिती किंवा घर दुरुस्ती मंडळ ह्या वरवरच्या मलमपट्ट्या आहेत. काँग्रेसला, सरकारला मूलभूत प्रश्नांना हात घालायचा नसतो. जागांचे राष्ट्रीयीकरण केले तर सरकार हजारो रुपये वारांनी जागा कशा विकू शकेल ?'

बंद, संप चळवळीमुळे एकत्रित येणाऱ्या डाव्यांच्या मतांवर आज कम्युनिस्टांची मुख्य मदार आहे; व काँग्रेसला ते मोठे आव्हान आहे....

□

'...बेळगाव प्रश्नावर तिथला एखादा उमेदवार मध्य मुंबईतून निवडून पाठवता आला असता तर, १८ डिसेंबरच्या 'मुंबई बंद'पेक्षाही, सीमा प्रश्नावरील आपल्या भावनांचे अधिक चांगल्या प्रकारे व परिणामकारक

प्रदर्शन आपल्याला करता आले असते. सेटलवाड रोडवरील रामकृष्ण निवासात माझ्याशी बोलताना जनसंघाचे उमेदवार डॉ. वसंतकुमार पंडित मला म्हणाले, '...नागपूरला अधिवेशनाच्या वेळी आम्ही या प्रश्नाची इतरांशी चर्चा केली. मी आणि गवई, दोघांनी मिळून सुंठणकरांना मुद्दाम नागपूरला बोलावून घेतले. पण विरोधी गटात एक मत होऊ शकले नाही. खुद्द श्री. किशोर पवारांना त्यांच्याच पक्षाकडून विरोध झाला. आणि ही एक चांगली सूचनाच बारगळली.... नंतर सर्वमान्य विरोधी उमेदवार शोधायचेही प्रयत्न निष्फळ ठरले. आणि म्हणून काँग्रेसला इथे मोकळे रान न देता विरोध करायची जबाबदारी, आव्हान मी माझ्या शिरावर घेतले आहे. आज वातावरण काँग्रेस विरोधी आहे. महागाईच्या भस्मासुराने परिसीमा गाठली आहे. जनतेत असंतोष ठसठसतो आहे. अशा वेळी काँग्रेसला प्रभावी विरोध न होता, जनतेचे असंतोषाचे मत कुजवले जाऊ दिले असते तर तो जनता द्रोह ठरला असता. एक जबाबदार अखिल भारतीय विरोधी पक्ष म्हणून जनसंघावर ही जबाबदारी येऊन पडली आणि हे आव्हान आम्ही स्वीकारले आहे.

जनसंघाच्या डॉ. पंडितांच्या प्रचाराची मुख्य भिस्त ह्या जनतेतल्या असंतोषावरच आहे. 'भुकेचे, रागाचे, असंतोषाचे प्रत्येक मत जनसंघालाच मिळेल.'

'त्रस्त जनता भ्रष्ट काँग्रेसला नष्ट करीलच!'

'भ्रष्ट काँग्रेस नष्ट करा' ह्या नाऱ्यांवर जनसंघाची प्रचारयंत्रणा उभी राहात आहे. खुद्द श्री. पंडितांनी सांगितल्याप्रमाणे, '...अटलजी, जगन्नाथरावजी वगैरे केंद्रीय नेते प्रचारार्थ नंतर येतीलच, पण आमची मुख्य भिस्त आहे घरोघर जाऊन मतदारांना भेटण्यावर, कॉर्नर मिटिंग्जवर, त्यांच्यातल्या असंतोषाला, सुप्त काँग्रेस विरोधाला साद घालण्यावर...' ह्याच मार्गांनी मुख्यत: जनसंघाचा प्रचार अत्यंत शिस्तबद्ध रीतीने चालू आहे.

'...इथे आहे तो मुख्य सामना काँग्रेस विरुद्ध जनसंघ हाच. त्याहीपेक्षा अधिक स्पष्ट म्हणजे, रजनी विरुद्ध पंडित हाच? आणि मी इथे स्वत:ला जनसंघाचा उमेदवार म्हणवून घेण्यापेक्षा जनतेचा, जनतेच्या रागाचा, तिच्या हालअपेष्टांचा उमेदवार म्हणवून घेणे योग्य ठरेल. म्हणजेच हा सामना भ्रष्ट काळाबाजाराला प्रोत्साहन देणारी काँग्रेस विरूद्ध जनता असा आहे. आणि जनता आज परिपूर्ण परिपक्व आहे. १९७१ साली इंदिराजींनी जे केले, इंदिरा हटाव विरोधात 'गरिबी हटाव' ची जी घोषणा त्यांनी दिली ती लोकांना अधिक योग्य वाटली. विरोधकांच्या सभांना गर्दी करून, त्यांचं स्पष्टीकरण ऐकून घेऊन लोकांनी इंदिरा काँग्रेसला निवडून दिले. आज परिस्थिती बदलली आहे. तीन वर्षे दिलेल्या संधीत देशाचे अधिकच मातेरे काँग्रेसने केले आहे. हे जनता ओळखून आहे. महागाई, अन्न दुर्भिक्ष, काळाबाजार, साठेबाजी हे सारे

सरकारी छत्राखाली होत असून त्यामुळे जनता त्रस्त झाली आहे. तिच्या रागाचा, चिडीचा आवाज उठवण्यासाठी मी उभा आहे; त्यामुळे जनतेचे मत आज निश्चित आहे. आज ही जनता, आपले मत पक्के करून काँग्रेसच्या सभांना गर्दी करील आणि मत विरोधी नोंदवील ह्याची मला खात्री आहे...'

मुंबईच्या प्रश्नावर बोलताना, 'बॅक बे' ला त्यांनी जोराचा विरोध दर्शवला. झोपडपट्ट्या, मोडीत आलेल्या चाळी इत्यादी ठिकाणच्या रहिवाशाचे त्वरित पुनर्वसन झाले पाहिजे अशीही त्यांनी मागणी केली. तेही हे पुनर्वसन जवळच्या जागातून झाले पाहिजे, मालवणी वगैरेसारख्या ठिकाणी नाही हेही त्यांनी आवर्जून सांगितले...

सध्याच्या परिस्थितीकडे वळून डॉ. पंडित पुढे म्हणाले, '...आजच्या परिस्थितीतही काँग्रेस ही निवडणूक जिंकू शकेल, जर त्यांनी दोन-तीन गोष्टी केल्या तर...

१ : लोकांना भरपूर, स्वस्त धान्य उपलब्ध करून दिले.

२ : रुपयाची आजची किंमत जी प्रत्यक्षात ३६ पैसे झाली आहे ती किमान ६२ पैशावर आणून दाखवली व

३ : बेळगाव प्रश्न सोडविला. अर्थात ह्या गोष्टी शासनाला शक्य नाहीत. परिस्थिती त्यांच्या पूर्णपणे आवाक्याबाहेरची आहे. माझे एक स्नेही काँग्रेस मंत्री आहेत त्यांनी खाजगीत बोलताना ह्या गोष्टीची कबूली देऊन सांगितले की 'ह्यात सुधारणा करणे अजिबात शक्य नाही. आज आहे ती परिस्थिती जरी आम्ही टिकवू शकलो तरी खूप.' अर्थात प्रबळ विरोधी पक्षाच्या अभावी, काँग्रेसला एवढे अपयश सर्वच आघाड्यावर येत असूनही मंत्रिमंडळी आपापल्या खुर्च्या टिकवून धरू शकत आहेत...

'...भ्रष्ट काँग्रेसच्या कारभारांचे वाचावे तेवढे पाढे थोडेच होतील. ते जनतेच्या इतक्या डोळ्यासमोर आहेत की त्याची खास ओळख काही करून द्यायची आवश्यता नाही. आजची काँग्रेस काय आहे? दुधावरची साय खाणारी ...धत्तुरा मिश्रीत मिलो देणारी... विषारी बाजरी भरविणारी...वंगणमिश्रित पाव खाऊ घालणारी...गोड साखर कडू करणारी...रुपयाची किंमत ३६ पैसे करणारी...महाराष्ट्र कर्नाटक सीमा वाद रेंगाळत ठेवणारी...हरिजनावरील भीषण अत्याचार थांबवू न शकणारी...जनतेला उपाशी मारणारी ...शेतकऱ्याला नाडणारी...कामगारांना विरोध करणारी...मुंबईकरांची शुद्ध हवा बंद करणारी...महागाई रोखू न शकणारी...काळाबाजार, भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारी... मुजोरी काँग्रेसचे हे स्वरूप लांबवता येईल हवे तेवढे. पण त्यात मला स्वारस्य नाही. एवढे मात्र निश्चित की ह्या साऱ्या विरुद्ध जनमत कौल ह्या निवडणुकीत जाणार आहे...'

शिवसेनेच्या प्रश्नाकडे वळून डॉ. पंडितांनी सांगितले, 'शिवसेना नेत्यांचा काँग्रेसचा पाठपुरावा त्यांच्या सैनिकांनाच मान्य नाही.त्यांचे कितीतरी सैनिक आज

माझ्याकडे येत आहेत. जनसंघाचे काम करीत आहे...महागाई विरोधी आंदोलनातल्या महिला आज जनसंघाच्या मागे ताकद लावून उभ्या आहेत...

'श्री. विक्रम सावरकरांची उमेदवारी हा दुर्दैवी प्रकार आहे. वास्तवात माझी उमेदवारी जाहीर झाल्यावर त्यांनी आपली उमेदवारी मागे घ्यायला हवी होती. अर्थात त्यांच्यामुळे निवडणूक निकालावर किंवा माझ्या मतांवर काही फरक पडेल असे मला वाटत नाही. हिंदू सभेचेही सुजाण मतदार, सावरकरांना मत देऊन वाया घालवण्याऐवजी संघाला मत देतील याची मला खात्री आहे...'

आमदार डॉ. पंडितांची विधानपरिषदेतली कामगिरी व विविध आंदोलनाचे नेतृत्व ह्यामुळे चारी उमेवारात ते अधिक उजवे ठरावेत असा त्यांच्या चाहत्यांचा दावा आहे ... त्यांच्या प्रचाराच्या सभा स्टेशना–स्टेशनांच्या समोर, कोपऱ्या-कोपऱ्यातून होत असून, त्यांच्या विजयाची त्यांच्या कार्यकर्त्यांना मोठी खात्री वाटते...

¤

आ. डॉ. पंडितांना श्री. सावरकरांची उमेदवारी दुर्दैवी वाटत असली तरी श्री. विक्रम सावरकरांचा दावा वेगळा आहे. ते म्हणतात, 'मागच्या निवडणुकीतला दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून शिवसेनेचाच ह्या उमेदवारीवर अधिक हक्क होता. पण त्यांचा उमेदवार उभा राहात नाही म्हणून मी माझी उमेदवारी जाहीर केली. ती जाहीर करताना मी एक दृष्टिकोन स्वीकारला होता. मुंबईत विशुद्ध राष्ट्रवादी व हिंदुत्त्व मानणाऱ्या शिवसेना आणि जनसंघ ह्या दोन प्रमुख संघटना हे दोन्ही पक्ष मध्य मुंबईतली निवडणूक स्वतःच्या ताकदीवर जिकू शकत नाहीत व त्या दोन पक्षांतले संबंध अहिनकुलवत आहेत. ह्या परिस्थितीत माझी उमेदवारी दोन्ही पक्षांना मान्य होऊन दोन्ही पक्षांचा पाठिंबा मला मिळून हिंदुत्त्वाचा मोठा एकत्रित आवाज उठेल ही माझी अपेक्षा होती. ह्या दृष्टीने मी स्वतः ह्या दोन्ही पक्षांना चाचपले होते. थोडी अनुकूलता दिसली तेव्हाच मी माझी उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर एकूण हिंदू समाजाच्या दुर्दैवाने जनसंघाने आपला उमेदवार जाहीर केला. तरीही मला जनसंघाचा राग नाही. त्यांच्या काही पक्षीय धोरणामुळे त्यांना मला पाठिंबा देता आला नसावा. शिवसेनेचे धोरण अद्याप जाहीर झालेले नाही. त्यांचे कार्यकर्ते माझे काम मात्र करू लागले आहेत. गेली काही वर्षे, कुठलाही आडपडदा न ठेवता हिंदुसभेने मुंबईत शिवसेनेबरोबर सहकार्य केलेले आहे... आमची माणसे त्यांच्या तिकिटांवर निवडून आलेली आहेत...

'... आणि शिवसेनेविषयी मला आदर आहे, प्रेम आहे. त्यांनी मला उद्या पाठिंबा दिला नाही तरी ह्या वस्तुस्थितीत फारसा फरक पडणार नाही. शिवसेनेने विशुद्ध राष्ट्रवाद, हिंदुत्त्व मुंबईत रुजवले, जनसामान्यांपर्यंत नेऊन भिडवले. काँग्रेस राजवटीच्या

धोरणांनी ह्या देशात स्वतःला 'हिंदु' म्हणवून घेणे कमीपणाचे वाटू लागले होते. शिवसैनिक व त्यांचे समर्थक आज अभिमानाने 'हिंदु' म्हणून मिरवू शकताहेत. हिंदूसभेला पन्नास वर्षांहून अधिक काळ काम करूनही जे जमले नाही ते शिवसेनेने साध्य करून दाखवले आहे. ह्यात वाद नाही. आणि तसे करताना तळाचा हिंदु समाज शिवसेनेने ढवळून काढला. त्यांच्यापर्यंत हिंदुत्व नेऊन भिडवले, त्यांना जागृत केले हे यश फार मोठे आहे... एवढ्यासाठीच आम्ही त्यांना पाठिंबा देत आलो. त्यांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक प्रश्नावर काम करीत आलो. आज शिवसैनिक न सांगताही माझे माम म्हणूनच करीत आहेत. उद्या शिवसेनेचा अधिकृत पाठिंबाही मला मिळेल असे मला वाटते...

जेमतेम चाळीशीतले सावरकर बोलण्यात रोखठोक आणि सरळसोट वाटले. त्याचे प्रचारकार्य सर्वांत आधी सुरू झालेले आहे. आणि त्याचाही भर प्रामुख्याने गट-सभांवरच आहे. मतदारसंघातल्या प्रत्येक मतदाराला जातीने जाऊन भेटण्याची त्यांची मनीषा आहे. रमेश देव, राजा परांजपे आदि कलाकार, डॉ. फडके, मंगेशकर मंडळी वगैरे या प्रयत्नात त्यांच्या पाठिशी आहेत. ◻

वेगवेगळ्या ठिकाणी हिंडून मिळालेले हे चित्र. पुढील आठवड्यात ते आणखीन स्पष्ट होईल. रविवार दि. ३०–१२ ला शिवाजीपार्कवर शिवसेनेची सभा आहे. त्यात शिवसेनेचे धोरण स्पष्ट होईल ही आशा आहे. त्याच दिवशी डाव्या गटातर्फे दोन लाख गिरणी कामगारांचा संप सुरू होत आहे. तो मुळातच हाणून पाडायचे डावपेच रजनी पटेलांतर्फे सुरू आहेत. २ जानेवारीला 'महाराष्ट्र बंद' पुकारला गेला आहे. शिवसेनेच्या घोषणेचा, डाव्या गटांच्या यशापयशांचा ह्या निवडणुकीवर मोठा परिणाम होईल ह्यात शंका नाही. ह्या परिणामांची कल्पना पुढील आठवड्यापर्यंत येऊ शकेल.

परंतु ह्या साऱ्या घडामोडीतून फार मोठी आलटापालट न झाल्यास, ही निवडणूक, परिस्थिती प्रतिकूल असतानाही जिंकणे काँग्रेसला जड जाणार नाही असे माझे मत ह्या विभागातून हिंडल्यावर झाले आहे. दुसऱ्या क्रमांकासाठी जनसंघ कम्युनिस्ट ह्यांच्यात चढाओढ लागेल. मात्र शिवसेनेने जर विक्रम सावरकरांना पाठिंबा घोषित केला तर ते दुसऱ्या क्रमांकाची मते घेऊन जातील.

● ● ●

## बेळगावचे मराठीपण : पृष्ठ १ वरून

कानडी प्रदेशात जखडले आहे हे खरे नाही.

बेळगाव या शहराबद्दल खरी आस्था वाटते ती आम्हा करवीरवासियांना. हा प्रश्न मराठी खासदार–आमदारांत जर खरी आच असती तर केव्हाच सुटला असता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी जसा महाराष्ट्र पेटला होता तसा तो कधीच या प्रश्नावर पेटला नाही. मराठवाडा–विदर्भ येथील आमदार–खासदार यांना बेळगाव महाराष्ट्रात राहिले काय किंवा कर्नाटकात–फारसे सोयरसुतक नाही. किंबहुना सांगली–मिरज–कोल्हापूर येथे हा विषय जितका जिवंत वाटतो तितका सातारा ओलांडून पुण्यात आल्यावर तेथे त्याचे म्हणावे तितके महत्त्व नसते. मग विदर्भ–मराठवाड्यातल्या लोकांना काय वाटणार ?

अर्थात महाराष्ट्र हा विशाल असल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठत नाही. या उलट म्हैसूरमध्ये मुळात राज्यच लहान असल्याने मोठी शहरे कमी. त्यामध्ये बेळगावसारखे शहर सहजासहजी ते कसे सोडणार? उद्या 'बेळगाव महाराष्ट्रा'त अशी जर सरकारी वर्तुळातून (दिल्ली संसद) जराशी जरी कुणकुण ऐकू आली तर एकजात सर्व कर्नाटक राजिनामे देऊन उभा ठाकेल. पण महाराष्ट्रात हे असंभवनीय आणि म्हणून स्व. नाथ पै यांच्याशी चर्चा करताना बाईंना कितीही जरी बेळगाव महाराष्ट्राचे हे पटले असले तरी गेली १७ वर्षे चालढकल चालली होती.

आता जाता जाता असे श्री. सोमणसाहेबांचे वास्तव्य बेळगावात नसल्याने बेळगाव काय आहे याची कल्पना नसावी. ८।१० वर्षे वडिलांची नोकरी बेळगावलाच प्रा. शिक्षक म्हणून झाली असल्याने मी तेथे होतो. तर बेळगावमध्ये १९५४।५५ साली केवळ बी. के. कॉलेज सोडले तर चिंतामणराव हायस्कूल, सरस्वती गर्ल्स स्कूल (शहापूर), मराठा मंडळ, वनिता मंडळ, बेनन स्मिथ वाङ्मय चर्चा मंडळ इ. सर्व शिक्षण संस्था मराठी. बी. के. मॉडेल मध्ये सुद्धा मराठी-कानडी दोन्ही माध्यमाची सोय होती. जवळ जवळ ९५ टक्के मराठी प्रा. शाळा होत्या. आम्हाला शिकविणारे काही शिक्षक (मास्ते, मडळगी, धोंगडी) हे मातृभाषा कानडी असली तरी मराठी शाळेत मराठी शिकविण्यासाठी होते. यावरून समजेल की, तो संपूर्ण भाग किती मराठीमय होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असो की राष्ट्र सेवा दल असो, शाखेतून बोलीभाषा मराठी. गणपत गल्ली म्हणा, व्यापारी पेठ, रविवार पेठ म्हणा, तेथील व्यापाऱ्यांच्या कीर्द खतावणी वह्या अद्याप मराठी आहेत.

बेळगावचे लोक इकडे येण्यास का उत्सुक आहेत याचे साधे उदाहरण देतो.

तुम्ही (मराठी माणूस) बेळगावात संध्याकाळी ७॥ वाजता without light सायकलवरून चालला आहात. तेथील पोलिसांनी हटकले तर काय पंचायत होते पहा. तो मराठी येत असले तरी कानडीत विचारतो. तो काय बोलतो ते मराठी माणसास काही कळत नाही. पुढे चला. पोलीस चौकीत वगैरे वगैरे. तेच काही वर्षापूर्वी तेथील पोलिसांना तेथील मराठी माणूस मराठीत सांगून आपली भूमिका सांगू शकत होता. साधा टेलिफोन करायचा असेल तर मराठी माणसाला कानडी आकडे येत नाहीत. बऱ्याचशा ऑपरेटर्संना मराठी आकडे ८९, ७९, ३५ अशा सारखे समजत नाहीत. पोस्टात कार्डे पाकिटे घेतली तर उरलेले पैसे मुकाट्याने घेऊन परतायचे. नाहीतर बरोबर तेवढेच पैसे घ्यावयाचे. शिवाय गुजराथी भाषा जितकी मराठीला जवळची आहे तशी कानडी नाही. कधीही गुजराथी न ऐकलेल्या मराठी माणसाला कोणी थोडावेळ गुजराथीत काही सांगितले तर त्याला काय म्हणावयाचे आहे हे गुजराथीत सांगता जरी नाही आले तरी समजेल. पण कानडी कुणी काही बोलल्यास एक शब्द समजला तर शपथ. तेव्हा दैनंदिन जीवनात हा जो काही त्रास होतो त्यासाठी मराठी माणूस महाराष्ट्रात येऊ इच्छितो आहे. एरवी तेथे महाराष्ट्रापेक्षा बरीच स्वस्ताई आहे. पण लोकांच्या घरची बासुंदी पुरी कितीही गोड लागत असली तरी घरची मीठ भाकरी कुणालाही आवडेल.

आता खरे म्हणजे भाषावार प्रांत रचना हा प्रकार पटण्यासारखा नाही यामध्ये खरी म्हणजे राष्ट्रीय एकात्मता राहात नाही. अगदी कालपर्यंत मराठी कानडी एकत्र नांदणारी माणसे केवळ या राजकीय गोंधळामुळे एकमेकां समोर खाऊ की गिळू म्हणून उभी राहतात. यासाठी खरे म्हणजे भारतात पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर व मध्य असे झोन्स पाडले पाहिजेत. या बाबतीत आपले राष्ट्रपती श्री. वराह गिरी वेंकट गिरी यांचे हेच मत आहे. म्हणजे सर्वांनाच एकमेकाबद्दल आत्मीयता (भारतीय म्हणून) वाटू लागेल. अन्यथा नाही. नाहीतर मी मराठी, तू कानडी तो गुजराथी हे राहणारच. भाषावार प्रांत रचना असे म्हटल्यावर, हरयाना, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश हे हिंदी भाषीक प्रदेश असून तेथे हिंदी राज्य का नाही ? उत्तर नाही. आहे हे असे आहे.

चालू परिस्थितीत बेळगाव हे कुणाणाच न देता बेळगाव, निपाणी, कारवार, दक्षिण कोकण इ. मिळून विशाल गोमांतकच निर्माण करून ते केंद्रशासित ठेवणे हा यावरील एकमेव मार्ग आहे. नाहीपेक्षा बेळगाव हे कोणालाही जरी दिले तरी त्याची प्रतिक्रिया विरुद्ध बाजूस कौल गेलेल्या राज्यात अत्यंत प्रखर होईल हे सांगण्यासाठी कोणा जोतिषाची गरज नाही. कळावे.

कोल्हापूर — सुरेश पाठक

....[ सोलकढी : मुखपृष्ठ २ वरून ]

मत आहे, त्यांना कोणता साबण प्रिय आहे, ते नाटक का लिहीत नाहीत, त्यांच्या आजोबांनी पोटापाण्यासाठी काय उद्योग केला, सीमावादात त्यांना कोणाची बाजू योग्य वाटते, पाच हजारांच्या बक्षिसाचे ते काय करणार, इत्यादी प्रश्नांची नीट उत्तरे मिळून माझ्या रसिक मनाला संतोष होईल. □

## टिटो, अटिटो, बटिटो, कटिटो

मध्य युरोपात युगोस्लाव्हिया नामे एक मागासलेला देश आहे. युरोपात सगळे देशच नव्हे तर एकूण सगळेच पुढारलेले आहे, अशी आपल्या कित्येक लोकांची समजूत असते ती तितकीशी खरी नव्हे. युगोस्लाव्हिया देशात मार्शल टिटो वय वर्षे ८२ नामे एक राजा राज्य करत आहे. दुसऱ्या महायुद्धात गनिमी फौज उभारून टिटोने आक्रमक जर्मन फौजांना सळो की पळो करून सोडले होते. युद्धानंतर युगोस्लाव्हियाने आपले भवितव्य टिटोच्या स्वाधीन केले. त्याबद्दल पश्चात्ताप करायची पाळी त्या देशावर कधी आली नाही. म्हणून आमरण टिटोंनीच आपला सांभाळ करावा, असा प्रेमळ आग्रह युगोस्लाव्हियाच्या जनतेने धरला होता. पण टिटो अगदीच पोचट. अशी जबाबदारी आपल्याला आमरण घेता यायची नाही; शरीर आणि बुद्धी थकली की आपण स्वेच्छेने निवृत्त होणार, असे मार्शलमहोदयांनी जाहीर करून टाकले आहे. त्यामुळे टिटोनंतर कोण, हा अवघड प्रश्न युगोस्लाव्हियापुढे पडला आहे. बरे टिटोनंतर त्याच्याच कुटुंबातल्या कुणा अटिटोने किंवा बटिटोने किंवा [illegible] वण्याची लोकशाही पद्धती युगोस्लाव्हियात नसल्यामुळे त्या राष्ट्राची अगदी गोची झाली आहे.

आपल्याकडे असे नाही. येथे कर्तृत्व काही कुटुंबांच्या आश्रयाने राहात असल्यामुळे कुटुंबातली एक कर्तृत्ववान व्यक्ती हरपली तर तिची जागा भरून काढणारी दुसरी, तिसरी, चौथी व्यक्ती त्याच कुटुंबात पैदा होऊ शकते. त्यामुळे स. गो. बर्वे वारले तेव्हा त्यांची जागा घ्यायला त्यांच्या भगिनी श्रीमती तारा सप्रे होत्याच; भाऊसाहेब बांदोडकर गेले पण त्यांची कन्या सौ. शशिकला काकोडकरांनी ती पोकळी भरून काढली; कम्युनिस्ट कृष्णा देसाईंचा खून झाला तेव्हा त्यांची जागा लढवायला त्यांची विधवा पत्नी होतीच. केंद्रीय मंत्री आनंदराव चव्हाणांच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली लोकसभेची जागा त्यांच्या पत्नी श्रीमती प्रेमलाबाई चव्हाण यांनी वारसाहक्काने सहज पटकावली. यामुळे होते असे की जीवनाच्या कोणत्याही लहानमोठ्या क्षेत्रात सामान्य भारतीय माणसाला आपण निराधार आहोत, असे कधी वाटत नाही. अ गेला तर ब आहे, ब गेला तर क आहे, क गेला तर ड आहे, ड गेला त . आं; एकूण आपला प्रतिपाळ करायला कोणीतरी सतत असणारच आहे, असा दिलासा आणि विश्वास भारतात प्रत्येकाला वाटत असतो. असे असूनही भारत हा एक मागासलेला (यालाच अलीकडच्या भाषेत ' विकसनशील ' असे म्हणतात) देश आहे, असे रंडक्यामुंडक्या पाश्चात्य राष्ट्रांनी उठवळपणे म्हणावे हे केवढे महदाश्चर्य ?

युगोस्लाव्हियासारखी जगातली मागासलेली राष्ट्रे भारताकडून अशा किती तरी गोष्टी खरे म्हणजे शिकू शकतील. पण लक्षात कोण घेतो ? □

[ सोलकढी : मलपृष्ठ १ वरून ]

## बंद मुंबई कशी दिसली ?

शहर मुंबईत, गेल्या काही दिवसात, एका बालिकेने आणि एका बाळाने बऱ्यापैकी धमाल उडवली होती. ही बालिका म्हणजे 'बॉबी' फेम डिंपल कापडिया आणि हे बाळ म्हणजे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, हे चाणाक्ष वाचकांच्या सहज लक्षात आले असेल. 'बॉबी' मुंबईत दाखल झाला आणि त्याने तिकीटविक्रीचे पूर्वीचे सगळे उच्चांक भुईसपाट केले. निर्देशित दराच्या तिकिटात 'बॉबी' पाहिलेला एकही प्रेक्षक मी पाहिलेला नाही. लहान थोर सगळे मुंबईकर 'साला' आणि 'आयला'सारखी 'बॉबी' आणि डिंपल ही नावे घेताहेत यात काय ते समजा. 'बॉबी' चाल चाल चालतो आहे; डिंपल त्याला चालवते आहे. पण १८ डिसेंबरच्या मंगळवारी तिचेही काही चालले नाही. त्या दिवशी चालले एकट्या बाळ ठाकऱ्यांचे. त्यांनी मुंबई बंद केली; आणि 'बॉबी'सकट अवघी मुंबई चक्क बंद पडली.

मुंबईसारखी अजस्र नगरी सहजी बंद पाडणे हे कलिंगड चिमटीत धरून चिरडण्याइतकेच अवघड होते. आजवर पुष्कळ मोठमोठ्या लोकांनी तसा प्रयत्न करून पाहिला होता. पण त्यांच्या तोंडाला फेस आला. मुंबई काही बंद झाली नाही. परवा बाळ ठाकऱ्यांनी मात्र अशक्य वाटणारी गोष्ट सहज शक्य करून दाखवली. महाराष्ट्र कर्तृत्वशून्य आणि नेभळट आहे असे बाळ ठाकरे असेपर्यंत तरी कोणी म्हणू शकणार नाही आणि कोणी तसे म्हणू लागलाच तर तिकडे महाराष्ट्राला लक्ष द्यायचे कारण नाही.

बाळ ठाकऱ्यांनी मुंबई का बंद केली याची वेगवेगळी कारणे जाणकार मंडळी सांगतात. माझा मात्र असा अंदाज आहे की, सीमाभागातील मराठी भाषिकांवर झालेल्या अत्याचारांचा निषेध करण्यासाठी आणि सीमावादाबद्दल मराठी जनतेची अस्मिता जागृत करण्यासाठी मुंबई बंदची कारवाई करण्यात आली. तसे असेल तर कदाचित मुंबई पुन: पुन: बंद करावी लागेल; मग महाराष्ट्र बंद करावा लागेल; मग भारत बंद करावा लागेल. एकूण, बेबंदशाहीला बंदशाहीचा उतारा द्यावा लागेल.

हे घडायचे असेल तेव्हा घडो. सध्या बंद मुंबई काय अफलातून मोहक दिसत होती, हे आठवण्यात मुंबईकर मग्न आहेत. गाड्या, बसेस, मोटारी बंद; शाळा-महाविद्यालये, कचेऱ्या, कारखाने बंद; दुकाने, चित्र-नाट्यगृहे, उपाहार गृहे बंद; गर्दी, आवाज, गडबड, खडखड, कोलाहल, धडधड बंद. बद मुंबई नेमकी कशी दिसत होती ते सांगायला एखादा कवी मनमोहनच हवा. येरागबाळ्याला किंवा खुद्द मलासुद्धा ते ते जमण्यासारखे नाही. एखादी गोष्ट जमण्यासारखी नसली की ती करून पाहायची समाजवादी आदत मला जडली आहे. म्हणून बद मुंबई नेमकी कशी दिसत होती ते सांगतोच तुम्हाला. पटते का पाहा.

मला तरी बंद मुंबई 'बॉबी'मधल्या डिंपलसारखी दिसली !

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर